सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २४ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## हिंदी सक्तीच्या निर्णयाला तुर्तास स्थगिती फडणवीस सरकारचा मोठा निर्णय




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ मुंबई**

राज्यातील मराठी आणि इंग्रजी शाळांमध्ये पहिली ते पाचवीपर्यंत हिंदी ही तिसरी भाषा म्हणून शिकवण्याच्या निर्णयावर राजकीय, सामाजिक वर्तुळ पूर्णपणे ढवळून गेल्यानंतर फडणवीस सरकारनं एक पाऊल मागं घेतलं आहे. याबाबत साहित्यिक, भाषा तज्ज्ञ, राजकीय नेत्यांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. त्यामुळे सरकारनं या निर्णयाला तूर्तास स्थगिती दिल्याचं मानलं जात आहे.

त्रिभाषा सूत्रासंदर्भात देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी सोमवारी बैठक झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री दादा भुसे, डॉ. पंकज भोयर आणि शिक्षण विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

सर्व राज्यांची स्थिती सर्वांसमोर मांडावी, नवीन शिक्षण धोरणांतर्गत मराठी मुलांचं ॲकडेमिक बँक क्रेडिटच्या अनुषंगाने होऊ नये, यासाठी इतर पर्यायांवर सर्वांसाठी समग्र सादरीकरण करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आलाय. त्याचबरोबर मराठी भाषेचे साहित्यिक, राजकीय नेते, सर्व संबंधितांसोमर सादरीकरण आणि सल्लामसलत प्रक्रिया करण्याविषयी बैठकीत ठरल्याची माहिती मिळत आहे.

## फडणवीसांच्या मतदारसंघात पाच महिन्यांत आठ टक्के मतदार वाढले

### काही बूथवर ५० टक्के वाढ, राहुल गांधींचा मोठा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४नागपूर**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानात मोठा घोळ झाल्याचा दावा सातत्याने केला आहे. त्यांनी वेगवेगळ्या अहवालांचा दाखला देत मतदानाच्या दिवशी शेवटच्या तासांत वाढलेल्या मतदानाची आकडेवारी, वाढलेले मतदार यासह मतदानाच्या निकालावर सातत्याने प्रश्न उपस्थित केले आहेत. दरम्यान, राहुल गांधी यांनी दावा केला आहे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातही मतदानाच्या आधी शेवटच्या पाच महिन्यांत अचानक आठ टक्के मतदार वाढले होते. मतदानाच्या दिवशी अनेक बूथवर अचानक २० ते ५० टक्के मतदार वाढल्याचं निदर्शनास आलं आहे.



राहुल गांधी यांनी महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत शेवटच्या क्षणात वाढलेल्या मतदारांवरून सातत्याने आक्षेप घेतला आहे. आता त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातील मतदानावरून प्रश्न उपस्थित केले आहेत. राहुल गांधी यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी न्यूजलॉन्ड्री या संकेतस्थळावरील माहिती शेअर करत म्हटलं आहे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघात (दक्षिण-मध्य नागपूर) शेवटच्या पाच महिन्यांमध्ये आठ टक्के मतदार वाढले आहेत. तर, काही बूथवर २० ते ५० टक्के मतदार वाढले.

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवेळी वाढलेल्या मतदारांच्या संख्येवरून निवडणूक आयोगाला सतत्याने प्रश्न विचारले आहेत. आता त्यांनी फडणवीसांच्या मतदारसंघातील आकडेवारीवरून मोठा दावा केला आहे.

### झूठ बोले कौवा काटे, देवेंद्र फडणवीसांचं राहुल गांधींच्या आरोपाला प्रत्युत्तर

झूठ बोले कौवा काटे, काले कौवे से डरियो, राहुल गांधी, महाराष्ट्रातील मोठ्या पराभवामुळे तुमचं दुःख दिवसेंदिवस वाढत आहे, हे मी मान्य करतो. पण तुम्ही कधीपर्यंत हवेत बाण सोडत राहणार आहात? पण तुमच्या माहितीसाठी महाराष्ट्रात २५ पेक्षा जास्त मतदारसंघ आहेत, जिथे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान ८ टक्क्यांपेक्षा जास्त मतदार वाढले आहेत आणि काँग्रेसने अनेक ठिकाणी विजय मिळवला आहे. माझ्या दक्षिण-पश्चिम मतदारसंघाला लागून असलेल्या पश्चिम नागपूर मतदारसंघात ७ टक्के मतदारांची (२७,०६५) वाढ झाली आहे. या मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी तेथे निवडणूक जिंकली आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

## माळेगाव साखर कारखाना निवडणुकीत अजित पवारच सरस, दादांच्या पॅनलला घवघवीत यश



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४बारामती**

अवघ्या राज्याचं लक्ष लागून राहिलेल्या माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी आज सकाळपासून मतमोजणीला सुरुवात झाली असून, पहिल्या टप्प्यातील निकाल समोर आले आहेत. या निवडणुकीत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. 'ब' वर्ग सभासद प्रतिनिधी या प्रवर्गातून निळकंठेश्वर पॅनलचे उमेदवार आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार विजयी झाले आहेत. ही निवडणूक स्थानिक साखर कारखान्यापुरती मर्यादित राहिलेली नसून, ती पवार कुटुंबाच्या राजकीय वर्चस्वाचं प्रतीक ठरली आहे. या निवडणुकीमध्ये सुरवातीपासून अजित पवारांनी आघाडी घेतली आहे. ही आघाडी त्यांनी अद्यापही कायम ठेवलेली आहे.

आतापर्यंत २१ जागांपैकी एका जागेवर अजित पवारांच्या निळकंठेश्वर पॅनेलचा उमेदवार विजयी झाला असला तरी दोन ठिकाणी निळकंठेश्वर पॅनेलच्या उमेदवारांची आघाडी दिसून येत आहे. अजित पवार माळेगाव सहकारी साखर कारखान्याची सत्ता स्वतःकडे राखण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सुरूवातीपासून आघाडी घेतलेल्या अजित पवारांच्या पॅनलने अद्यापही ती आघाडी टिकवून ठेवली आहे. त्यामुळे कारखान्याची सत्ता अजित पवारांच्या हातात जाणार असल्याची चर्चा आता बारामतीत रंगली आहे.

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील निळकंठेश्वर पॅनलने पहिल्या फेरीत विजय मिळवत सुरुवातीपासूनच आघाडी घेतली आहे. त्यामुळे त्यांच्या पॅनलच्या संपूर्ण यशाचे संकेत मिळत आहेत. मात्र, दुसरीकडे इतर पॅनल्सही जोरदार संघर्ष करत असल्यामुळे ही निवडणूक आता अधिक चुरशीची आणि रोमाचंक वळणावर पोहोचली आहे. या निवडणुकीत अजित पवार यांना थेट ८५ वर्षीय भाजपचे नेते आणि माळेगाव साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष चंद्रराव तावरे यांचे आव्हान आहे. त्याशिवाय एकूण चार पॅनल्स रिंगणात असल्यानं ही लढत फारच अटीतटीची ठरत आहे. अजित पवार यांचा विजय ही निळकंठेश्वर पॅनलसाठी सकारात्मक सुरुवात असली, तरी अंतिम निकाल काय लागतो आणि कोण सत्तेवर येते, याकडे साऱ्यांचं लक्ष लागून आहे. पुढील काही तासांत या निवडणुकीचा अंतिम निकाल स्पष्ट होणार आहे.

## शक्तिपीठ महामार्गास कॅबिनेटची मंजुरी

### महाराष्ट्र GST कायद्यात होणार सुधारणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**




राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाची कॅबिनेट बैठक आज मंत्रालयात संपन्न झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आजच्या बैठकीत शक्तिपीठ महामार्गास मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील १८ तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या या महामार्गास अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा विरोध असतानाही मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आल्याने शेतकरी आंदोलक आक्रमक होतील, असे दिसून येते. तसेच, राज्यात वस्तू व सेवा कर विधेयक आणण्याचा निर्णयही या बैठकी घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग - पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी ( जि. सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गास मान्यता. राज्यातील साडे तीन शक्तिपीठ , दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर अंबेजोगाई सहित १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग. प्रकल्प महामंडळामार्फत राबवणार, प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता.

आदिवासी शासकीय वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता व आहार भत्त्यामध्ये वाढ. दरमहा मिळणाऱ्या निर्वाह व आहार भत्त्यात दुपटीने वाढ, वार्षिक शैक्षणिक साहित्य खरेदी भत्त्यात भरीव वाढ,

कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग),महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करून, आगामी अधिवेशनात महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विधेयक आणणार,

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांसाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीतील तडजोडीसाठी सुधारणा विधेयक आणणार.

## पंढरपुरात विठ्ठल टोकन दर्शनाचा काळा बाजार

### बोगस टोकन घेऊन येणाऱ्या सात भाविकांना पकडले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४पंढरपूर**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी नव्याने टोकन दर्शन सुविधा सुरु करण्यात आली आहे. मात्र नव्याने सुरू करण्यात आलेल्या टोकन दर्शनाचा काळाबाजार काही दिवसातच समोर आला आहे. यामध्ये बोगस टोकन दर्शनाची पास घेऊन येणारे सात भाविकांना पकडण्यात आले आहे. तर टोकन दर्शन पासमध्ये हेराफेरी झाल्याने टोकन प्रणाली विषयी साशंकता निर्माण झाली आहे.



श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढली आहे. भाविकांना सुलभ व जलद दर्शन देण्यासाठी टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस, बेंगलोर यांच्याकडून सेवाभावी तत्वावर टोकन दर्शन प्रणाली विकसित करून घेतली आहे. या प्रणालीद्वारे भाविकांना आधीच दर्शनाची वेळ निश्चित करून दर्शनासाठी रांगेत न थांबता ठराविक वेळेत दर्शन हॉलमध्ये प्रवेश घेता येणार आहे. ही प्रणाली विशेषत: गर्दीच्या काळात गर्दीचे व्यवस्थापन, भाविकांचा वेळ व श्रम वाचण्यास मदत होण्यास प्रभावी ठरेल या अनुषंगाने टोकण दर्शन पद्धत सुरू करण्यात आली आहे.

तिरूपती बालाजी देवस्थानच्या धर्तीवर पंढरपुरात विठ्ठल दर्शनासाठी टोकन दर्शन प्रणाली सुरू करण्यात आली आहे. दिवसभरात जवळपास १८०० भाविकांना टोकन दर्शन दिले जात आहे. विठ्ठल मंदिर समितीकडून टोकन दर्शनपास बुकिंग सुरू करण्यात आली आहे. मात्र अवघ्या दहा दिवसातच ही प्रणाली कुचकामी ठरली आहे. आज सात भाविकांनी बनावट टोकन दर्शन पास दाखवून दर्शन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु त्यांचा हा प्रयत्न मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांच्या सावधगिरीमुळे फसला आहे.

## हिंसक आंदोलन करण्यास भाग पाडू नका, बच्चू कडू यांचा सरकारला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

आम्ही सरकारने दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवला आहे. सरकारने आता हिंसेचे आंदोलन करण्यास आम्हाला भाग पाडू नये. सरकारने असे षडयंत्र रचले असल्यास, त्यांना त्याचे पाप भोगावे लागेल, असा स्पष्ट इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी दिला आहे. पत्रकारांशी बोलताना बच्चू कडू म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योग्यवेळी कर्जमाफी दिली जाईल असे सांगितले आहे, पण यापेक्षा योग्य वेळ कोणती हे त्यांनी सांगावे. गेल्या सहा महिन्यात १००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. सरकारला आणखी शेतकऱ्यांनी आत्महत्या करायला हव्यात असे वाटत आहे का, असा सवाल बच्चू कडू यांनी केला. तीन दिवसाच्या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफी केव्हा होणार ही तारीख घोषित करावी असे आवाहन कडू यांनी केले.



## उज्ज्वल निकमांनी कोर्टात वाल्मिक कराडचा डाव हाणून पाडला



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४बीड**

वाल्मिक कराडने युक्तिवाद करत असतांना आपला सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या कटात आपला हात नसल्याचे सांगत, या प्रकरणी मकाको लागत नाही. असं सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपीचा या युक्तिवादाला आम्ही जोरदार विरोध केला. सोबतच न्यायालयाला हे स्पष्ट करून सांगितलं की, आरोपी विरोधात काय काय पुरावे आहे. त्या संपूर्ण पुराव्यांची जंत्री आम्ही न्यायालयासमोर सादर केली. त्याच प्रमाणे कटाचा मुख्य सूत्रधार कायम पडद्यामागे असतो आणि आपल्या कटपूतल्यांचे आधारे तो वाईट कृत्य करत असतो. मात्र या प्रयत्न आपण हाणून पाडला आहे. अशी प्रतिक्रिया विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी दिली आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज (२४ जून) बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यानंतर त्यांनी या प्रकरणाच्या सुनावणीवर भाष्य करत प्रतिक्रिया दिली.

### संतोष देशमुख हत्या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ जुलैला

मा. न्यायालयासमोर आम्ही प्रतिपादन केलं असून येत्या ७ जुलैपर्यंत न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. असेही सरकारी वकील उज्वल निकम म्हणाले. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ जुलै रोजी होणार असून आज कोर्टाचे कामकाज तीन तास चालले. यावेळी आरोपी वाल्मीक कराडच्या वकिलांकडून दोन तास युक्तिवाद करण्यात आला. तर विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी एक तास युक्तीवाद केला. दरम्यान यावेळी केवळ दोषमुक्ती अर्जावर युक्तिवाद झाला, अशी माहितीही आता समोर आली आहे. मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज (२४ जून) बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. मागील सुनावणी दरम्यान न्यायाधीश रजेवर असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. दरम्यान आजच्या सुनावणीला विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची देखील उपस्थिती होती.

## अजित पवारांच्या खात्यावर 'वॉच' ठेवा,एकनाथ शिंदेंचे मंत्र्यांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

अजित पवार निधी देत नाही असा नाराजीचा सूर लावलेल्या शिवसेनेच्या मंत्र्यांना एकनाथ शिंदे यांनी आदेश दिला आहे. 'अजित पवारांच्या खात्याकडे गडगंज निधी आहे, त्यावर लक्ष ठेवा. तो निधी कुठे वितरित होतो याची माहिती घ्या', असा आदेश एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांना दिल्याची माहिती काही खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. कॅबिनेटच्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांची वेगळी बैठक घेतली. त्यामध्ये निधी वाटपावरुन शिंदेंच्या मंत्र्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याची माहिती समोर आली आहे.



महायुती सरकारच्या तीन घटक पक्षांमध्ये निधी वाटपासंबंधी सातत्यानं धुसफूस सुरू असल्याचं दिसून येतंय. त्यातही शिंदेंच्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्याविषयी अनेकदा नाराजी व्यक्त केली आहे.

राज्यातील निधी वाटपावरुन एकनाथ शिंदे आक्रमक झाल्याचं दिसून आलं. अजित पवारांच्या खात्यावर बारकाईनं लक्ष ठेवा असा थेट आदेशच त्यांनी त्यांच्या पक्षातील मंत्र्यांना दिला. अजित पवारांच्या खात्यात १४-१४ हजार कोटींचे दोन निधी आहेत. त्यावर लक्ष ठेवलं पाहिजे.'हा निधी कुठे वितरीत होत आहे यांची माहिती आपल्याला मिळाली पाहिजे', असंही एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. 'जे आपल्या हक्काचं आहे ते घेतलंच पाहिजे, असा आदेशच एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांना दिला. त्यामुळे आता अजित पवारांच्या अर्थखात्यावर शिवसेनेचा डोळा असेल अशा चर्चांना उत आलाय.

## संपादकीय ......

# युद्धखोरीची किंमत

अमेरिकेने फोर्डो, इस्फाहान आणि नतान्झ या तीन ठिकाणी असलेली इराणची अणुकेंद्रे उद्ध्वस्त केली. त्यानंतर इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्र वर्षाव करतानाच, होर्मुझ खाडीचा जलमार्ग व्यापारासाठी बंद करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय इराणच्या कायदे मंडळाने घेतला असून, तो अंमलात आल्यास त्याचा भारतासह जगभरातील अनेक देशांच्या इंधनपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. याचे कारण कच्चे तेल आणि वायूच्या व्यापारासाठी हा जलमार्ग महत्त्वाचा आहे. जोपर्यंत इराण आणि इस्रायल युद्ध दोन देशांपुरते होते, तोपर्यंत जगाला याची फारशी काळजी नव्हती; पण खाडीची नाकेबंदी झाल्यानंतर, तेलाचे भाव गगनाला भिडतील. या भीतीमुळेच जगभरातील शेअर बाजार दिवसाच्या सुरुवातीलाच कोसळले. इराणने इस्रायलच्या १० शहरांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला असून, आमचा अणुऊर्जा विकासाचा कार्यक्रम सुरूच राहणार असल्याची गर्जना केली आहे. याचा अर्थ, युद्धाची तीव-ता वाढणार असून, इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यापैकी कोणीही माघार घेतलेली नाही. इराणला महान बनवण्याचा निर्धार करा न पेक्षा इराणमध्ये सत्तापालट होईल, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. मागे ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतर दोन आठवड्यांनीच तत्कालीन राष्ट्राध्यक्षांनी इराकवर हल्ला करण्यासाठी योजना आखण्याचे आदेश दिले होते. खरे तर, ९-११ शी इराकचा काहीही संबंध नव्हता.

जर्मनी, फ्रान्स, कॅनडा, न्यूझीलंड या अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांनीही इराकवर हल्ला करण्यास विरोध दर्शवला होता; पण इराकमध्ये सर्वनाश ओढवणारी रासायनिक शस्त्रास्त्रे दडवली असल्यामुळे हे आक्रमण गरजेचे असल्याचा अमेरिकेचा दावा होता. मात्र, दाव्यात तथ्य नसल्याचा निर्वाळा खुद्द संयुक्त राष्ट्र संघाने दिला होता. इराकवर हल्ले करू नका, या मागणीसाठी युरोप-अमेरिकेत लाखोंचे मोर्चे निघाले; पण तरीही १९ मार्च २००३ रोजी अमेरिकेने बगदादवर बॉम्बहल्ले करून विध्वंसक युद्धाला सुरुवात केली. त्यापाठोपाठ बसरा शहरावर बॉम्बहल्ले केले. त्यात हजारो लोक मृत्युमुखी पडले. स्त्रिया, मुले व सामान्यजनांचे प्राण घेणारी ही हिंसक कारवाई मानवतेच्या दृष्टीने चिंताजनक ठरली. अमेरिकेने आपले सैन्य इराकमधून मागे घ्यावे, असे आवाहन करतानाच, भारताने तेव्हा इराकला १०० कोटी रुपयांची मदत केली आणि ५० हजार मेट्रिक टन गहूही पाठवला. इराकच्या युद्धात एक लाखावर नागरिकांचे प्राण गेले. राष्ट्राध्यक्ष सद्दाम हुसैन यांना फाशी देण्यात येऊन, अमेरिकेने मर्जीतले कळसूत्री सरकार तेथे स्थापित केले. त्यानंतर इराकच्या तेलाच्या खाणींवर अमेरिकेने दीर्घकाळ ताबा अबाधित राखला. हे युद्ध म्हणजे वास्तविक १९९१ च्या आखाती युद्धाचाच पुढचा अंक होता. कुवेतवरील आक्रमणाद्वारे सद्दामने अमेरिकेला आव्हान दिले होते. म्हणून अमेरिकेने सद्दामला धडा शिकवला. त्यापूर्वी अफगाणिस्तानात अमेरिकेने आक्रमण केले होते.अफगाणिस्तान आणि इराकमधील या अमेरिकी कारवाईनंतर 'इसिस' या दहशतवादी संघटनेचा जन्म झाला आणि मुस्लिमबहुल देशांमध्ये त्यानंतर दहशतवाद मोठ्या प्रमाणात वाढला. यावेळी इस्रायल आणि अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांमध्ये सुदैवाने इराणच्या अणुकेंद्रांतून गळती झालेली नाही. अणुबॉम्बने जसे नुकसान होते, तशाप्रकारची जोखीम अण्वस्त्रांमध्ये नसते; पण किरणोत्सर्ग होण्याची भीती नाकारता येत नाही. इराणवर सहजपणे मात करू शकतो, असे इस्रायलला वाटत असले, तरी इराणने डागलेली कित्येक क्षेपणास्त्रे निकामी करण्यात इस्रायलच्या लष्कराला यश आलेले नाही.

ट्रम्प यांनी करवाढीची कुर्‍हाड चालवून, १ एप्रिलपासून जगात व्यापार युद्धास आरंभ केला. त्यामुळे जागतिक व्यापारास फटका बसला. नंतर किंचित माघार घेऊन, मग त्यांनी इराणविरुद्ध इस्रायलला चेतवण्याचे काम केले. त्यामुळे जागतिक अर्थकारणावर काय परिणाम होईल, याची त्यांना कसलीही पर्वा नाही. इराणमध्ये सत्तापालट घडवणे, हे या मोहिमेमागील उद्दिष्ट नव्हते, असे अमेरिकेचे संरक्षणमंत्री पिट हेग्सेथ यांनी म्हटले आहे; पण इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांनी आमचे न ऐकल्यास, त्यांचा सफाया करू आणि राजवट बदलू, अशी धमकी ट्रम्प यांनी यापूर्वी दिलेली आहे. नेतान्याहू आणि ट्रम्प यांच्यासारख्या युद्धखोर नेत्यांमुळे जग नाहक युद्धाच्या खाईत लोटले जात आहे. भूतकाळापासून अमेरिका काहीएक शिकायला तयार नाही, हाच या सगळ्याचा अर्थ, त्यातून युद्धाचा आणखी भडका उडण्याची आणि अनर्थाची शक्यताच अधिक!

# दहावी, बारावीची पुरवणी परीक्षा आजपासून



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) दहावी आणि बारावीची पुरवणी परीक्षा आज मंगळवारपासून (दि.२४) सुरू होणार आहे. त्यासाठी दहावीच्या ३४ हजार ५६२ तर बारावीच्या ६८ हजार ९८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, दरवर्षीच्या तुलनेत यंदा पुरवणी परीक्षा लवकर होत असल्याचे राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी स्पष्ट केले आहे. फेब्रुवारी-मार्चमध्ये झालेल्या परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थी, श्रेणीसुधार करू इच्छिणार्या विद्यार्थ्यांना संधी देण्यासाठी राज्य मंडळाच्या मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, लातूर, छत्रपती संभाजीनगर, कोकण, नाशिक या नऊ विभागीय मंडळांमार्फत २४ जून ते १६ जुलै या कालावधीत पुरवणी परीक्षा आयोजित केली आहे.दहावीच्या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या ३४ हजार ५६२ विद्यार्थ्यांमध्ये २४ हजार २४५ मुले, १० हजार ३१६ मुली, तर एका तृतीयपंथी विद्यार्थ्याचा समावेश आहे. तसेच बारावीच्या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या ६८ हजार ९८ विद्यार्थ्यांपैकी ४५ हजार १४४ मुले, २२ हजार ९५३ मुली, एक तृतीयपंथी विद्यार्थी आहे.

परीक्षेसाठी राज्य मंडळाने प्रसिद्ध केलेले वेळापत्रकच ग्राह्य धरावे. सकाळच्या सत्रात १०.३० वाजता, तर दुपारच्या सत्रात २.३० वाजता परीक्षा कक्षात उपस्थित राहणे आवश्यक आहे. सकाळच्या सत्रात सकाळी ११ वाजता, तर दुपारच्या सत्रात तीन वाजता उत्तरपत्रिकांचे वितरण करण्यात येईल. परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वाढवून देण्यात आली आहेत. पुरवणी परीक्षेसाठी प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ऑनलाइन पद्धतीने भरून घेतले जाणार आहेत, असेही स्पष्ट करण्यात आले.

# विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीला राज्य बँकेचे प्रशासक अनासकर यांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती-** विदर्भातअग्रगण्य असलेली शैक्षणिक संस्था विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीच्या मुख्य कार्यालयाला सोमवारी दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबईचे प्रशासक विद्याधर अनासकर, व्यवस्थापकीय संचालक दिलीप दिघे, अमरावती शाखेचे व्यवस्थापक किशोर राऊत तसेच त्यांचे सहकारी राजेंद्र पाथरे यांनी सदिच्छा भेट दिली व संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. या प्रसंगी विदर्भयुथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे बच्या हस्ते मान्यवर पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सदर प्रसंगी विदर्भ युथ



वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे उपाध्यक्ष अ‍ॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, प्रा. डॉ. सौ. पुनम चौधरी, पकंज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे उपस्थित होते. यावेळी अनासकर यांनी संस्थेच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले




# भात खाल्ल्यावर कोलेस्टेरॉल वाढण्याची भीती वाटते? बघा भाताचा आणि कोलेस्टेरॉलचा नेमका काय संबंध

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

भात हा बहुतांश लोकांचा अतिशय आवडीचा पदार्थ. लहान मुलांना तर साधं वरण भात, तूप मीठ भात विशेष आवडतात. मेतकूट भात, लोणचं भात, फोडणीचा भात, दही भात असे भाताचे पदार्थही अतिशय आवडीने खाल्ले जातात. पण जसं जसं वय वाढत जातं, तसं तसं भात खाण्याची भीती वाटत जाते. भात खाल्ल्याने वजन वाढतं, रक्तातील साखरेचे प्रमाणही वाढते, असं आपण नेहमीच ऐकतो. भात खाल्ल्याने कोलेस्टेरॉलही वाढतं, असं म्हणतात. हे सगळं कितपत खरं आहे आणि भाताचा कोलेस्टेरॉलवर नेमका काय परिणाम होतो ते पाहूया..



भात खाल्ल्याने कोलेस्टेरॉल वाढतं का?

भाताचा आणि कोलेस्टेरॉलचा नेमका काय संबंध याविषयीची जी माहिती यांनी प्रकाशित केली आहे त्यानुसार शेतात पिकलेला तांदूळ आणि आपल्या घरात येणारा तांदूळ यात खूप मोठा फरक असतो. कारण या दरम्यान तांदळावर खूप प्रक्रिया केली जाते.

त्यामुळे तांदळामधले कित्येक पौष्टिक घटक नाहीसे होतात. आता भातामध्ये फक्त कार्ब्स राहतात. भात जर तुम्ही योग्य प्रमाणात खाल्ला तर त्यामुळे वजन वाढत नाही. पण तो खाताना त्याच्यासोबत भाजी, कडधान्ये, डाळी असं काहीतरी खाणं गरजेचं असतं.

अभ्यासानुसार असंही समोर आलं आहे की कोलेस्टेरॉल वाढण्यासाठी किंवा कमी करण्यासाठीही भात करणीभूत ठरत नाही. भात केवळ पचायला हलका असतो.

पण इतर धान्यांच्या तुलनेत त्यात पौष्टिक घटक खूप कमी असतात. त्यामुळे पांढरा भात खाण्यापेक्षा इतर काही धान्यं खावीत जी जास्त पोषण देऊ शकतील आणि शरीरातली बॅड कोलेस्टेरॉलची पातळी कमी करू शकतील. तसेच पांढऱ्या भातापेक्षा ब्राऊन राईस किंवा फोर्टीफाईड राईस खाणे अधिक चांगले असंही तज्ज्ञ सांगतात.

# मर, मुळकुज व खोडकुज या रोगांवर जालीम उपाय, करा ह्या बुरशीचा वापर




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

शेतकऱ्यांना त्यांच्या शेतामध्ये कापुस, कडधान्य पिके, तेलबिया पिके व भाजीपाला तसेच ऊस पिकावर मर, मुळकुज, खोडकुज, मुळावरील गाठीचा रोग इ. अनेक प्रकारचे रोग आढळून येतात.

या रोगांना कारणीभूत फ्युजारीअम, व्हर्टिसिलीयम, रायझोक्टोनिया, स्क्लेरोसियम, फायटोपथोय या विविध बुरशी आहेत. या बुरीना नियंत्रित करण्यासाठी जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्माचा उपयोग करावा.

ट्रायकोडर्मा हि बुरशी पिकाला हानीकारक नसून, ती बियाण्यावरील रोग पसरविणाऱ्या बुरशीची वाढ होऊ देत नाही व रोगकारक बुरशीचा नायनाट करून पिकाचे संरक्षण करते.

**ट्रायकोडर्माची कार्यपद्धती**

ट्रायकोडर्मा दि बुरशी इतर हानीकारक बुरशींच्या धाग्यांना विळखा घालून आपले साम्राज्य पसरविते व त्यातील पोषक द्रव्य शोषून येते परिणामी अपायकारक बुरशींचा बंदोबस्त होतो.

तसेच हानीकारक बुरशींना लागणारे कार्बन, नायट्रोजन, व्हिटॅमिन इ. ची कमतरता निर्माण होऊन हानीकारक बुरशींची वाढ खुंटते. त्याचप्रमाणे ही बुरशी ग्लायटॉक्झीन व व्हिरीडीन नावाचे प्रतिजैविक निर्माण करते जे ठानीकारक बुरशींना मारक ठरतात.

ट्रायकोडर्मा बुरशी काही प्रमाणात सुत्रकृमीचे नियंत्रण करते असे प्रयोगाअंती आढळून आले आहे. ट्रायकोडर्मा बुरशी मातीतील सेंद्रिय पदार्थ कुजण्यास मदत करते त्यामुळे सेंद्रिय खत निर्मितीमध्ये ऊसाचे पाचट कुजण्याकरीता उपयोग होतो.

**ट्रायकोडर्माचे फायदे**

बियाण्यास ट्रायकोडर्मा या बुरशीची बीजप्रक्रिया केल्यामुळे उगवण शक्ती वाढण्यास मदत होते तसेच इतर हानीकारक रोगजन्य बुरशींचा नायनाट होतो.

जमिनीतील सेंद्रिय पदार्थ कुजवून देण्यास मदत करते. त्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो.

पिकाच्या संपुर्ण वाढीच्या अवस्थेपर्यंत पिकाचे संरक्षण करते.

ट्रायकोडर्मा ही बुरशी नैसर्गिक

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

**पिके रोग वापराची पद्धत वापरण्याचे प्रमाण**

सर्व पिकांसाठी मर, मुळकुज, खोडकुज. बीजप्रक्रिया करणे पेरणीच्या वेळी ४ ट्रायकोडर्मा प्रति किलो बियाण्यास हाताने चोळावे. सर्व पिकांसाठी मर, मुळकुज, खोडकुज. माती प्रक्रिया १ ते २.५ किलो ट्रायकोडर्मा २५-३० किलो चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून एक एकर क्षेत्रातील मातीत मिसळावे व लगेच पाणी द्यावे.

**डाळिंब व इतर फळझाडे**मर, मुळकुज. द्रावणाद्वारे झाडाच्या बुंध्याजवळ१० ते १५ ग्रॅम ट्रायकोडर्मा एक लिटर पाण्यात द्रावण करून झाडाच्या बुंध्यापाशी टाकून मातीने झाकावे.

# अमरावतीकर उद्योजकांसाठी संधी:२६ जून रोजी उद्योजक मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती,** व्यवसाय मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाच्या उद्देशाने, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि 'दे आसरा फाऊंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजक मेळाव्याचे आयोजन गुरुवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी करण्यात आले आहे. हा मेळावा सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील ए. वि. थिएटर (सभागृह), मराठी विभागात होणार आहे. या मेळाव्यात पुणे येथील मॅनेजमेंट थियाट्रिक्स, स्टिम्युलेटर, कॉर्पोरेट ट्रेनर आणि कन्सल्टंट डॉ. रवींद्र आहेर मार्गदर्शन करणार आहेत. अमरावतीचे युवा उद्योजक आणि ईसीई इंडिया एनर्जीज प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक अमित आरोकर यांची विशेष मुलाखत घेण्यात येणार आहे, ज्यातून त्यांच्या यशस्वी उद्योजकतेचा प्रवास उलगडेल.या उद्योजक मेळाव्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक उद्योजकाला मोफत उद्यम प्रमाणपत्र काढून मिळणार आहे, जो त्यांच्या व्यवसायासाठी एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल.अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त उद्योजकांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे. उपस्थिती नोंदवण्यासाठी हींीिं://षेीा.सश्रश/ ींपलीहङ८हर्ĝीथिणि६ या लिंकवर जाऊन नोंदणी करावी. कोणत्याही अडचणीसाठी ९७३०८६२८७० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नेपाळच्या अल्पवयीन विवाहितेने दिला बाळाला जन्म

## तीन वर्षांपासून पतीसोबत अमरावतीत वास्तव्य, गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती:**नेपाळच्या अल्पवयीन विवाहिताने एका बाळाला जन्म दिला. मातेचे वय कमी असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात येताच नात्यांनी राजापेठ पोलिसांना माहिती दिली. त्या आधारावर पोलिसांनी तिच्या बयाणावरून पतीविरुध्द गुन्हा दाखल केला. दोघेही तीन वर्षांपासून राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पती-पत्नी म्हणून राहत होते.

अल्पवयीन मुलीचे सन २०२३ मध्ये आई-वडिलांच्या उपस्थितीत व रितीरीवाजाप्रमाणे नेपाळमध्ये एका युवकासोबत लग्न झाले. त्यानंतर दोघेही पती-पत्नी म्हणून अमरावतीला आले आणि राजापेठ ठाण्याच्या हद्दीत भाड्याने खोली करून राहतात. तिचा पती चायनीजची गाडी चालवतो.

दरम्यान मुलगी गर्भवती राहिली. तिला जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान तिने १७ जून रोजी एका बाळाला जन्म दिला. परंतु ती अल्पवयीन असल्यामुळे डॉक्टरांनी राजापेठ पोलिसांना याबाबतची माहिती दिली. पोलीसांनी तिचे बयाण नोंदविले.तिने पोलिसाना दिलेल्या बयाणानुसार, डिसेंबर २०२३ रोजी नेपाळमध्ये राहणाऱ्या एका युवकासोबत तिचा विवाह झाला. पती अमरावतीला चायनीज गाडी चालवित असल्यामुळे लग्नानंतर दोघेही अमरावतीला आले. त्यानंतर सप्टेंबर २०२४ मध्ये ती गर्भवती राहली आणि १७ जूनला बाळाला जन्म दिला. भारतीय कॅलेंडरनुसार तिचा जन्म १२ ऑगस्ट २००८ तर १४ डिसेंबरला २०२३ रोजी विवाह झाला.

सध्या ती १७ वर्षांची आहे आणि पती २१ वर्षांचा आहे. तिचे लग्न झाले होते तेव्हा ती केवळ १५ वर्षांची होती आणि पतीचे वय १९ वर्ष होते, असे तिने बयाणात सांगितले.त्या आधारावर पोलिसांनी बाल लैगिंक अत्याचार पोक्सो कायद्याअंतर्गत तिच्या पतीविरुध्द गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

मंगळवार दि. २४ जून २०२५

शहर/ग्रामिण


# अमरावतीला ५ नव्या ई-शिवाई एसटी बसेस:आ. सुलभा खोडकेंच्या हस्ते लोकार्पण

## अमरावती-नागपूर पहिल्या बसमध्ये ३५ प्रवासी रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती-** मागील दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर अमरावती एसटी विभागाला सोमवारी पाच नव्या इलेक्ट्रिक शिवाई बसेस मिळाल्या. सकाळी ११ च्या सुमारास आ. सुलभा खोडके यांच्या हस्ते या पाचही ई-शिवाईचे लोकार्पण करण्यात आले. ११.४५ वाजताच्या सुमारास अमरावती-नागपूर या पहिल्याच ई-शिवाई बसमध्ये ३५ प्रवासी नागपूरकडे रवाना झाले. तपोवन येथील एसटीच्या कार्यशाळेत एकाचवेळी १७ बसेस चार्ज करण्याची सोय आहे. तसेच एकदा चार्ज केली की ही ई बस २८० किमी धावते. उर्वरित. पान ४ ई-



शिवाई तिकिटाचे दर हे शिवशाहीच्या तुलनेत थोडेसे जास्त आहेत. अमरावती ते नागपूर प्रवासाचा विचार करता शिवशाहीने प्रौढांना ३८८ रुपये, महिला व ज्येष्ठ नागरिकांना २०३ रुपये तर शिवाईने प्रवासाकरिता प्रौढांना ४१४ रुपये. तसेच महिला व ज्येष्ठ नागरिकांना २१७ रुपये खर्च करावे लागतील. अमरावती ते परतवाडा प्रवासाकरिता शिवशाहीने प्रौढांना १३५, महिला व ज्येष्ठ नागरिकांना ७१ रु. तर शिवाईने प्रौढांना १४४ व महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना ७६ रु. तिकीट दर पडेल. तसेच अमरावती-यवतमाळसाठी शिवशाहीने प्रौढांना २३९, महिला व ज्येष्ठांना १२५ तर शिवाईने प्रवास करण्यासाठी प्रौढांना २५५ तसेच महिला व ज्येष्ठांना १३४ रुपये मोजावे लागणार आहेत.

### ई-शिवाई बसचे तिकीट शिवशाहीपेक्षा थोडे जास्त राहणार; महिलांना अर्धे तिकीट

येत्या आठवड्यात आणखी १५ बसेस मिळणार येत्या एका आठवड्यात अमरावती विभागाला आणखी १५ ई-शिवाई एसटी बसेस मिळणार आहेत. त्या आल्यावर चंद्रपूर, वर्धा, संभाजीनगर या ठिकाणी ई-शिवाई बस सेवा सुरू केली जाईल. व्हीआयपींना आरामदायक प्रवास हवा असतो. महिलांसाठी अर्धे तिकीट असून, ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास असल्यामुळे या बसमधून प्रवास करताना अडचण येणार नसून, आरामदायी प्रवास होणार आहे. **नीलेश बेलसरे,** एसटी विभागीय नियंत्रक, अमरावती.

# रुग्णवाहिकेसह नांदगाव खंडेश्वरचे ग्रामीण रुग्णालय आले सलाईनवर

## शिवसेनेचा (उबाठा) जिल्हा शल्यचिकित्सकांना आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती**

नांदगाव खंडेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयाला विविध समस्येने ग्रासले असून, सगळीकडे अस्वच्छता परिपूर्ण सोयी सुविधा नसल्याने रुग्णालयाची इमारत शोभेची वास्तू ठरली आहे. तसेच रुग्णवाहिका सतत नादुरुस्त असल्याने रुग्णांची हेळसांड होत असल्याचा आरोप करत शिवसेनेचे उबाठा गटाचे प्रकाश मारोटकर यांनी तत्काळ उपाययोजना कराव्या. अन्यथा आंदोलनाचा इशारा जिल्हा शल्य चिकित्सकांना सोमवारी निवेदनातून दिला. नांदगाव खंडेश्वर हे तालुक्याचे मुख्यालय असून ग्रामीण रुग्णालयातील नादुरुस्त रुग्णवाहिका रुग्णांना नेहमी जिल्हा पातळीवर उपचारासाठी घेऊन जाते. या वेळी रुग्ण व त्यांचे नातेवाईक जीव मुठीत घेऊन प्रवास करतात. अनेकदा रुग्णवाहिका रस्त्यातच बंद पडल्याने खासगी वाहनाने नातेवाईक रुग्णांना घेऊन जातात. तसेच रुग्णालयाची इमारत शोभेची वास्तू ठरली



असून रुग्णालयाच्या तीन इमारती उभ्या असतानाही परिपूर्ण सोयीसुविधा उपलब्ध नाहीत. येथील तज्ञ डॉक्टर, नर्सची पदे रिक्त आहेत. तसेच वीजपुरवठाही व्यवस्थित होत नाही. त्यामुळे रुग्णाच्या उपचार, शस्त्रक्रियेसाठी असलेले यंत्र, मशीनरी निकामी ठरत आहेत. पाण्याची सोय नसल्याने रुग्णालयात साफसफाई नियमित होत नाही. अनेक समस्यांनी ग्रामीण रुग्णालयाची इमारत ग्रासली आहे. नांदगाव तालुक्यातून समृद्धी महामार्ग, वर्धा-संभाजीनगर हायवे, अमरावती- यवतमाळ हायवे जात असून अपघातासह इतर रुग्णांची ग्रामीण रुग्णालयात गर्दी असते. रुग्ण जास्त असल्याने मंगरूळ चव्हाळा, लोणी टाकळी, तळेगाव येथील रुग्णवाहिका बोलवावी लागते. ती यायला एक तास वेळ लागतो, असे निवेदनात नमूद आहे. रुग्ण दगावण्याची शक्यता असते. त्यामुळे खासगी वाहनाने रुग्णांना न्यावे लागते. ग्रामीण रुग्णालयाला दोन मोठ्या अतिरिक्त नवीन रुग्णवाहिका देण्यात याव्या. तसेच तत्काळ रिक्त जागा भरून येथील सोयीसुविधा वाढवाव्या. अन्यथा आगामी काळात शिवसेना (उबाठा) तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांना निवेदनातून दिला आहे.

# मतदार संघात विकास कामांचा ड्रायझोन करायला निघालेत का?

## येत्या दहा वदिसात रद्द झालेला नधी मंजर करून आणावा

### माजी आमदार देवेंद्र भुयार यांचा विद्यमान आमदारांना संतप्त प्रश्न?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४वरूड-** मोर्शी -वरुड विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणुकांपूर्वी गावा व शहरांमध्ये प्रचंड विकास कामांची पूर्तता तत्कालीन आमदार देवेंद्र भुयार यांनी त्यांच्या सततच्या पाठपुराव्याने विद्यमान उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून केली.

न भूतो: न भविष्य: अशी मूलभूत व सामान्य नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने व प्रशासनाच्या दृष्टीने , त्याचबरोबर शेतकऱ्यांच्याही सोयीची कामे यानिमित्ताने या मतदारसंघात झालीत व आजही अनेक कामे प्रगतीपथावर आहेत.

जातीपाती धर्माच्या राजकारणात न अडकता, नौटंकी न करता केवळ मोर्शी वरुड विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास देवेंद्र भुयार यांनी उरी बाळगला होता. आणि म्हणूनच पाणीपुरवठा प्रकल्प असो,रस्ते विकास प्रकल्प असो, बंधाऱ्यांची कामे,असो पानंद रस्त्यांची कामे असो घरकुलांचे प्रश्न असो,मोर्शी,वरूड,शेंदुर्जना घाट या शहरातील विविध मूलभूत कामे रस्त्यांची कामे असो विद्युतीकरणाची कामे असो, भूमिगत विद्युतीकरणाची कामे असो, पुनर्वसनातील रस्त्यांची -नाल्यांची कामे असो, ग्रामीण रुग्णालय असो, तलाठी कार्यालय,असो किंवा तहसील कार्यालय, पर्यटन, वनविभाग, आरोग्य यंत्रणा सक्षम करणे असो,सामाजिक उपक्रमांची नांदी,विद्यार्थी व युवक युवतींसाठी वाचनालय अभ्यासिका, उद्यान आदी बाबी त्यांनी पूर्णत्वास नेल्या यात कोणाच्याही प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

गेली आठ महिने विधानसभा निवडणुका झाल्यानंतर सुद्धा दिल्ली ते गल्लीपर्यंत सत्ता असणाऱ्या विद्यमान मोर्शी वरुड मतदारसंघाचे आमदार यांनी विकास कामे आणणे तर दूर परंतु देवेंद्र भुयार यांनी मोर्शी, वरूड ह्या तालुक्याच्या ठिकाण असणाऱ्या महत्त्वपूर्ण शहरातील व शेंदुर्जना घाट सारख्या मोठ्या शहरातील सुमारे १५ कोटींची विकास कामे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परीक्षेत्रात राहत अधिसूचित विशिष्ट नागरिक सेवा सुविधा पुरविण्यासाठी केलेला मंजूर निधी व कामे रद्द केली असल्यामुळे माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी निषेध व्यक्त केला असून १० दिवसामध्ये आम्ही आम्ही मंजूर करून आणलेली विकासकामे विद्यमान आमदारांनी मंजूर करून दाखवावी असे प्रतिपादन माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी पत्रकार परिषदेद्वारे केले.

दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त नियोजन मंत्री अजित पवार यांना देवेंद्र भुयार यांनी वरील तिन्ही शहरातील विकास कामांसाठी १५ कोटीचा निधी अनुदानित कराव्या अशी विनंती केली होती,आणि याच अनुषंगाने १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी सदर निधी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२४/प्र. क्र. ८७(३६)/का. १४११, मंत्रालय मुंबई, नुसार मंजूर सुद्धा करण्यात आला.

सदर निधी केवळ रोड नाल्यांसाठी नव्हता तर समाजातील सर्व घटक, पंथ, यांना अपेक्षित असलेली विकास कामे व बहुउद्देशीय सभागृहे व तिथले सौंदर्यकरण व तिथली विकास कामे मंजूर झाली होती.

यामध्ये कुणबी, माळी, तेली, धनगर, जैन, मुस्लिम, बौद्ध, शीख, संताजी महाराज सभागृह,भोई समाज, शिंपी समाज, अनेक बुद्ध विहार,अनेक हिंदू मंदिरे, वरुड येथील राम मंदिर चित्तेश्वर मंदिर सती माता दुर्गा मंदिर लोणारी कुणबी समाज सावता महाराज मंदिर असे अनेक समाधानी मागणी केलेल्या परिसरातील स्थायी विकास कामांच्या मंजुराती या निमित्ताने झाल्या होत्या.

आमदारकीला आता नऊ महिने पूर्ण होणार असून सुद्धा स्वतःच्या पाठपुराव्याच्या जोरावर



स्थानिक विकास निधी सोडता कुठलेही विशेष काम किंवा अर्थसंकल्पात एक नव्या रुपयाची तरतूद विद्यमान आमदार करू शकले नाही , आणि जी कामे यापूर्वीच मंजूर आहेत ती सुद्धा स्वार्थासाठी रद्द करण्याचा महाप्रताप त्यांनी या निमित्ताने केला आहे. या बाबीचा निषेध पत्रकार परिषदेच्या निमित्ताने उपस्थित सर्व समाजातील घटक व प्रतिनिधी आज करत असून, मागील पाच वर्षात मोर्शी वरुड मतदारसंघात झालेल्या प्रचंड विकास कामानंतर आता या मतदारसंघातील विकास कामांना सत्ताधारीच आमदार ब्रेक लावून मतदार संघाचा ड्रायझोन करणार का हा प्रश्न या पत्रकार परिषदेच्या वतीने विचारण्यात आले आहे यावेळी पत्रकार परिषदेला माजी आमदार देवेंद्र भुयार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्य कार्यकारिणी सदस्य बाळू पाटील कोहळे, युवक जिल्हाध्यक्ष अंकुश घारड, तालुका अध्यक्ष विजय वडसकर, युवक तालुका अध्यक्ष निलेश गोमकाळे, जिल्हा उपाध्यक्ष तुषार देशमुख, शहराध्यक्ष देव बेलसरे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य संदीप खडसे यांच्यासह मोर्शी वरूड शेघाट येथील शेकडो नागरिक उपस्थित होते.

# केंद्रीय मंत्री अमित शाहांकडून दर्यापूर तालुका खविसंचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४दर्यापूर-** एकेकाळी सहकार क्षेत्रातील खरेदी विक्री संस्था दर्यापूर महाराष्ट्रात दोन नंबरवर कार्यरत होती. शासनाच्या आंतरराष्ट्रीय सहकारासाठी दर्यापूर तालुका खरेदी विक्री संस्थेला मुंबई येथे नाफेड बाजार मंजूर केला असून, त्यानिमित्ताने संस्थेचे अध्यक्ष गजानन जाधव यांना प्रमाणपत्र देऊन केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते सन्मानित केले आहे.

या वेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोड, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चव्हाण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील,कृषिमंत्री माणिक कोकाटे, नांदेड अध्यक्ष जेठाभाई अहिर यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमा दरम्यान झालेल्या बैठकीला खरेदी विक्री संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर कोरपे, सचिव मधुकर पाचे, सहसचिव संजय चांदूरकर, संचालक भैयासाहेब टेकाडे, संस्थेचे व्यवस्थापक राजेंद्र पाटील गावंडे उपस्थित होते. संस्थेला प्रथमच मंजूर झालेल्या नाफेड बाजारचे स्टोअरमधून धान्य, डाळी, तांदूळ व सर्व प्रकारचे ड्राय फ्रूट संस्थेतर्फे विक्रीसाठी नाफेड बाजार शॉपी दर्यापूर -अकोट रोड स्थित रा. णा. गणोरकर कॉम्प्लेक्स खविसं येथे सुरू केली आहे.

संस्थेला मिळालेल्या सन्मानाबद्दल भागधारक सभासदांकडून सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन करण्यात येत आहे.




# उद्याला होणार सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांचे अमरावती शहरात आगमन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती-** देशाचे सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई हे बुधवार २५ जून रोजी दुपारी २ वाजता आपल्या मायभूमीत अमरावती येथे आगमन करणार आहेत.

त्यांच्या नागरी सत्काराचा भव्य समारंभ सायंकाळी ६ वाजता प्रवीण पोटे कॉलेज परिसरातील स्वामी विवेकानंद सभागृहात - होणार असून, या कार्यक्रमाच्या तयारी युद्धपातळीवर सुरू असून ती



जवळपास पूर्ण झाल्याचे जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनील देशमुख व ॲड. राजेंद्र पांडे यांनी आज प्रसार माध्यमांना सांगितले. या समारंभात एक विशेष अतिथी म्हणून देशाचे माजीसरन्यायाधीश न्या. एन. व्ही. रमण्णा देखील उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. न्या. गवई आणि न्या. रमण्णा यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध असून, अनेक खंडपीठांमध्ये ते एकत्र काम केले आहेत. दरम्यान, न्या. गवई यांचे बंधू डॉ. राजेंद्र गवई यांनी सांगितले की, २५ जूनला अमरावतीत, २६ जूनला छत्रपती संभाजीनगर येथे आणि २७ व २८ जूनला नागपूर येथे न्या. गवई यांचा सत्कार होणार आहे. नागपूरमध्ये बार असो सिएश नकडून नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

### कार्यस्थळांची सुरक्षा पाहणी पूर्ण

दरम्यान, शहर पोलीस व विशेष शाखेच्या अधिकाऱ्यांनीसर्किटहाऊसपासूनतेपोटेकॉलेज परिसरातील विवेकानंद सभागृहापर्यंत सुरक्षेची पाहणी केली आहे. न्या. गवई यांना झेड श्रेणीची सुरक्षा उपलब्ध असून, त्या प्रोटोकॉलनुसार त्यांचा ताफा व सर्व व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यांचे चार्टर्ड प्लेनने आगमन होण्याची शक्यता असून, हवामान लक्षात घेता त्यांच्या आगमनाच्या वेळेत थोडाफार बदल होऊ शकतो.

### सर्किट हाऊसमध्ये आगमनाची शक्यता

न्या. गवई यांचे अनेक सहकारी वकील आणि मित्रपरिवार अमरावतीत आगमन करून सर्किट हाऊसमध्ये मुक्काम करणार असल्याची शक्यता आहे. न्या. गवई देखील अमरावतीत येताच सर्किट हाऊसला जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता सुरू होणारा कार्यक्रम वेळेतच सुरू केला जाणार असल्याची माहिती वकील संघाच्या सूत्रांनी दिली.

### विवेकानंद सभागृहात होणार रक्ततुला

सभागृहात एका बाजूस वजन काट्याच्या स्वरूपात मंचावर व्यवस्था करण्यात आली आहे. येथे मर्यादित लोकांनाच प्रवेश असेल. याठिकाणी न्या. गवई यांची रक्ततुला होणार आहे. वकील संघाने यासाठी दोन दिवसांचे रक्तदान शिबीर घेऊन आवश्यकतेपेक्षा ९ युनिट अधिक रक्त संकलित केले आहे. त्यानंतर नागरी सत्काराचा समारंभ होईल. हा कार्यक्रम अत्यंत भव्य स्वरूपाचा असणार आहे. यामध्ये ॲड. सुनील देशमुख स्वागत व गौरवपर भाषण करणार आहेत. तसेच पालक न्यायमूर्ती न्या. अनिल किलोर, न्या. प्रवीण पाटील, न्या. नितीन सांबरे, माजी सीजेआय न्या. रमण्णा आणि स्वतः सरन्यायाधीश न्या. भूषण गवईयांची भाषणात भाषणे होणार आहेत.

# प्रभाग रचनेचा प्रस्ताव देणार आता निवडणूक आयोगाला, सरकारचा सुधारित आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती** – महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या प्रभाग रचनेचे प्रस्ताव राज्य सरकारच्या नगरविकास विभागामार्फत राज्य निवडणूक आयोगाला सादर केले जाणार आहेत. नगरविकास विभागाने सोमवारी प्रभाग रचनेचे विविध टप्पे आणि त्यासाठी जबाबदार असलेले संबंधित अधिकारी याबाबत शुद्धिपत्रक जारी केले.

नगरविकास विभागाने १० जून रोजी मुंबईसह २९ महापालिका तसेच नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या प्रभाग रचनेचे प्रारूप तयार करण्याचे आदेश जारी केले होते. त्यानुसार मुंबईसह अ, ब, क आणि ड महापालिका क्षेत्रातील प्रभाग रचनेचे प्रारूप तयार करण्याची जबाबदारी संबंधित महापालिका आयुक्तांवर सोपविण्यात आली आहे.

प्रारूप प्रभाग रचना तयार करून त्याला राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्याची जबाबदारी आयुक्तांवर सोपविण्यात आली होती. त्यानुसार आयुक्तांकडून थेट आयोगाला प्रारूप सादर होणे अपेक्षित होते.

### अशी होईल प्रभाग रचना

मुंबईसह प्रत्येक महापालिकेला नगरविकास विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव आणि प्रधान सचिवांना प्रभागांची प्रारूप रचना सादर करावी लागणार आहे. त्यानंतर विभागाकडून छाननी होऊन प्रभाग रचनेच्या मान्यतेचा प्रस्ताव आयोगाला सादर होईल. निवडणूक आयोगाची मान्यता मिळाल्यानंतर आयुक्त प्रभागरचना



प्रसिद्ध करतील. या प्रभाग रचनेवर राज्य सरकारने प्राधिकृत केलेला अधिकारी सुनावणी घेईल. या सुनावणीनंतर मसुदा आयुक्त नगरविकास विभागाला सादर करतील.

**वर्ग महापालिकांसाठी ही पद्धत राबविणार–** वर्ग महापालिकेत प्रभाग रचना तयार करून संबंधित महापालिका आयुक्त त्याचा आराखडा जिल्हाधिकाऱ्यांना सादर करतील. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत हा प्रस्ताव नगरविकास विभागाला मान्यतेसाठी पाठवला जाईल. पुढे नगरविकास विभागाकडून राज्य निवडणूक आयोगाला प्रभाग रचनेचा प्रस्ताव पाठवण्यात येईल. नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधील प्रभाग रचना संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडून केली जाईल.नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या प्रभाग रचनेचा प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी नगरविकास विभागाला सादर करतील. प्रभाग रचेनला राज्य निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळाल्यानंतर ती प्रसिद्ध करणे आणि त्यावर हरकती, सूचना विचारात घेऊन सुनावणी घेण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. तर अंतिम प्रभाग रचना मुख्याधिकारी जाहीर करतील.

# रामदास कदम म्हणतात.... भास्कर जाधव नौटंकी, जनताच संन्यास देणार, तो काही एवढा मोठा माणूस नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४रत्नागिरी–** मला मंत्रिपद मिळायला पाहिजे होते, मी तेव्हा बोललो. मी आजही बोलेन. उद्याही बोलेन. मला मंत्रिपद का मिळायला नको, हे मला कोणी सांगायला हवे. कार्यकर्ते कमी होत आहे, म्हणून निवृत्ती घ्यायचे काहीच कारण नाही. ३९ जागांपैकी मी एकटा निवडून आलो आहे. शेवटी आठ–आठ वेळा वेगवेगळ्या निवडणुका जिंकल्यानंतर असे वाटते की, आता थांबायचा विचार करावा, यापेक्षा वेगळे कारण नाही, असे ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी म्हटले होते. यावरून राजकीय वर्तुळातून अनेक प्रतिक्रिया उमटत आहेत. कोकणातील शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी भास्कर जाधव यांच्यावर सडकून टीका केली आहे.




एकनाथ शिंदे सुरतला गेले, होते तेव्हा भास्कर जाधव हे पण सुरतपर्यंत आले होते, ते सुरतच्या बॉर्डरपर्यंत जाऊन आले. पण एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, तुम्ही येऊ नका, असा दावा करतानाच भास्कर जाधव नौटंकी करत आहेत. उद्धव ठाकरेंकडे येऊन चूक केली असे ते म्हणतात. गुहागरची जनता आता भास्कर जाधव यांना संन्यास देणार आहे, ते फक्त १२०० मतांनी निवडून आलेले आहेत, या शब्दांत शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी भास्कर जाधव यांच्यावर हल्लाबोल केला. ते मीडियाशी बोलत होते.

भास्कर जाधव जे बोलले तेवढा तो मोठा माणूस नाही. १९९५ आणि २००० मध्ये मीच बाळासाहेबांना सांगून त्यांना तिकीट द्यायला सांगितले होते. नौटंकी करण्यात भास्कर जाधव यांचा हात कोणी पकडू शकणार नाही. भास्कर जाधव हे खोटारडे आहेत. एखाद्या व्यक्तीला बदनाम कसे करायचे हे भास्कर जाधव यांच्याकडू शिकावे, अशी टीका रामदास कदम यांनी केली.

# संघाच्या अखिल भारतीय प्रांत प्रचारक बैठकीत ठरणार शताब्दी वर्षाचे नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर** – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय पातळीच्या प्रांत प्रचारक बैठकीचे दिल्लीत आयोजन करण्यात येणार आहे. ४ ते ६ जुलै या कालावधीत होणाऱ्या या बैठकीत संघाच्या शताब्दी वर्षाच्या नियोजनावर भर राहणार आहे.

संघाच्या प्रणालीनुसार दरवर्षी अखिल भारतीय पातळीवरील प्रांत प्रचारकांच्या बैठकीचे आयोजन होत असते. संघाच्या संघटनात्मक रचनेत एकूण ११ क्षेत्र व ४६ प्रांत आहेत. यंदाच्या बैठकीत देशातील सर्व प्रांत प्रचारक, सह प्रांत प्रचारक, क्षेत्र प्रचारक व सहक्षेत्र प्रचारक सहभागी होतील. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे, सहसरकार्यवाह



डॉ. कृष्णा गोपाल, सी. आर. मुकुंदा, अरुण कुमार, रामदत्त, आलोक कुमार, अतुल लिमये यांच्यासह अखिल भारतीय कार्यकारिणीचे सदस्य व विविध कार्य विभागाचे प्रमुख, सह–प्रमुख या बैठकीत उपस्थित राहतील.

येत्या विजयादशमीपासून संघाच्या शताब्दी वर्षाला सुरुवात होणार आहे. त्यानिमित्ताने संघाकडून देशभरात वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यादृष्टीने झालेल्या नियोजनाला अंतिम स्वरूप देण्याचे काम या बैठकीत होईल. त्याचप्रमाणे या बैठकीत संघाच्या नुकत्याच संपलेल्या प्रशिक्षण वर्गांचा अहवाल आणि आढावा, सरसंघचालकांचा पुढील वर्षाचा प्रवास आराखडा यावरदेखील चर्चा होईल.

मार्चमध्ये आयोजित अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या बैठकीनंतर आगामी योजनेच्या अंमलबजावणीची रूपरेषा आखण्याच्या दृष्टिकोनातून ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

दिल्लीत केशव कुंज या संघाच्या कार्यालयात ही बैठक होईल, असे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी स्पष्ट केले आहे.

# बळीराजाला चांगले दिवस येवो, बेरोजगारांना रोजगार मिळो आणि महिला अत्याचार कमी व्होवो

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पांडुरंगाकडे प्रार्थना
## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा सहकाऱ्यांसह पालखी सोहळ्यात सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ पुणे**
राज्यातील बळीराजा आज हवालदिल झालेला आहे, अवकाळी पावसाने शेतातील उभं पिक वाया गेलं, शेतमालाला भाव मिळत नाही, त्याचे जगणेच कठीण झाले आहे. शेतकऱ्याला चांगले दिवस येवो, बेरोजगारांना रोजगार मिळो, महिलांवरील अत्याचार कमी होवो आणि आता विश्वात्मके देवे, ही संकल्पना साकार करण्याच्या अनुषंगाने दुरितांचे तिमिर जावो,विश्व स्वधर्म सूर्य पाहो, जो जे वांछील तो ते लाहो, प्राणिजात, अशी प्रार्थना पांडुरंग चरणी करतो, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ



यांनी म्हटले आहे.

पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या पालखी सोहळ्यात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज सहभाग घेत सावळ्या विठ्ठलाचे नामस्मरण केले. पुणे–सोलापूर महामार्गावरील यवत गावातून दिंडी क्रमांक २८२ मध्ये सहभागी होत वरवंड गावापर्यंत ते सहकाऱ्यांसह पायी चालले. यावेळी त्यांनी वारकऱ्यांशी संवादही साधला.यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, वारकरी संप्रदायाने समता, बंधुता, सामाजिक न्याय आदी मुल्यांची पेरणी करत समतेचा मोठा संदेश समाजाला देऊन अध्यात्मिक क्रांती घडवली आहे. भारताचा स्वातंद्र्य संग्रामही याच विचाराने प्रभावित होता आणि स्वांतत्र्यानंतर देशाच्या संविधानामध्येही हाच विचार संमिलीत झालेला आहे. पुढे याच विचारावर महाराष्ट्र धर्म स्थापन झाला. आज महाराष्ट्र धर्म वाचवायचा असेल तर वारीत सहभागी होणे, संतसाहित्य, बहुजन हिताय, बहुजन सुखाय, हे अनुभवावे यासाठी काँग्रेसजण या पालखीत सहभागी झाले आहेत. देशात समाजवाद व बंधुत्व यांचे संवर्धन व संरक्षण झाले पाहिजे ही आमची अभिलाषा आहे असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

या पालखी सोहळ्यात हर्षवर्धन सपकाळ यांच्या सोबत प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष माजी आमदार मोहन जोशी, प्रदेश सरचिटणीस राजन भोसले, पुणे शहर काँग्रेस अध्यक्ष अरविंद शिंदे, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, संजय बालगुडे, अजय छाजेड, प्रवक्ते गोपाल तिवारी, प्रकाश सोनावणे, अमर खानापुरे, श्रीरंग बर्गे, पृथ्वीराज पाटील आदी उपस्थित होते.

# नागपुरात वारंवार वीज पुरवठा का खंडित होतो?

## मुख्यमंत्री, गडकरींकडून अधिकाऱ्यांची कानउघाडणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४नागपूर :**
मागील काही काळापासून शहरातील विविध भागांत वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. यावरून नागरिकांमध्ये नाराजीचा सूर असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीदेखील महावितरण, महापारेषणच्या अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. या बैठकीत इतर लोकप्रतिनिधींनीदेखील तक्रारींचा पाढा वाचला, अशी माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, आता तरी महावितरणचा कारभार सुरळीत होईल का हा सवाल कायम आहे.

नागपुरात झालेल्या आढावा बैठकीत नेत्यांनी महावितरणच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली. गेल्या काही महिन्यांपासून वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेष म्हणजे दिवसाच्या कोणत्याही वेळी वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. ऐन उकाड्यात रात्रीच्या वेळी वीज बंद होत



असल्याने नागरिकांची चांगलीच गैरसोय होत आहे, याकडे आमदारांनी लक्ष वेधले. यावेळी बैठकीला उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत विचारणा करण्यात आली असता, त्यांना समाधानकारक उत्तर न देता आल्याने फडणवीस आणि गडकरींनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील वीजपुरवठ्यासंदर्भात स्वतंत्र बैठक घेऊन नेमक्या येत असलेल्या समस्या त्यात मांडाव्यात. समस्या तात्काळ सोडवून वीजपुरवठा देण्याचे स्पष्ट आदेश दिले.

# जिल्हाधिकारी कार्यालयामध्येच कंत्राटी कर्मचाऱ्याने काढले कपडे

## जिवन प्राधिकरणातीलअधिकारी पोहोचले ठाण्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४यवतमाळ**
गेल्या ५ वर्षांपासून वेतनापासून वंचीत असलेल्या एका कंत्राटी कर्मचाऱ्याने चक्क जिल्हाधिकारी यांच्या कक्षासमोर अंगावरील कपडे काढत आंदोलन करीत प्रशासनाचे लक्ष वेधले. हा प्रकार सोमवारी दि. २३ जूनला दुपारच्या सुमारास घडला असून तो कर्मचारी जीवन प्राधिकरण कार्यालयात कंत्राटी कामगार म्हणून कार्यरत होता. रोहन रामटेके असे असे त्या कंत्राटी कर्मचाऱ्याचे नाव आहे. या घटनेने जिल्हाधिकारी कार्यालयात एकच खळबळ उडाली, घटनेचे गांभीर्य लक्षात घेता शहर पोलिसांना पाचारण करण्यात आले असून त्या कर्मचाऱ्याला शहर पोलिसांनी स्थानबध्द केले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय यवतमाळ येथे रोहन रामटेके हा पंप ऑपरेटर म्हणून २०२० पासून कर्तव्यावर होता.वेतनापासून वंचीत असलेल्या कंत्राटी कर्मचारी रोहन रामटेके याने जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन केले. दरम्यान त्याला शहर पोलिसांनी ताब्यात घेत पोलिस ठाण्यात आणले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी, जीवन प्राधिकरण कार्यालयाचे कार्यकारी अभियंता प्रफुल व्यवहारे यांना पोलिस ठाण्यात बोलवून संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्याच्या मागण्याबाबत विचारणा करण्यात आली. आणि त्याला पोलिस ठाण्यात स्थानबद्ध केले.




# काँग्रेसच्या उभारीसाठी खामगाव मतदार संघात नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

## काँग्रेसचा जनाधार टिकवून ठेवण्याचे नव्या शिलेदारासमोर आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४खामगाव–** खामगाव विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतल्यानंतर मतदार संघात चांगलीच उलथापालथ झाली आहे. या मतदारसंघात काँग्रेसचे अनेक वर्षे वर्चस्व राहिले आहे. प्रदेश काँग्रेसकडून पक्षाला उभारी देण्याचा प्रयत्न सुरू आहे. याच अनुषंगाने मागील काही दिवसांत नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आल्या आहेत. काँग्रेसचा मोठा जनाधार असल्यामुळे तो टिकून ठेवण्याचे आव्हान नव्या शिलादारासमोर उभे आहे.



खामगाव मतदार संघाचे सलग तीन वेळा आमदार राहिलेले काँग्रेसचे माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा राजीनामा देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यामुळे या मतदार संघातील राजकीय वातावरण ढवळून निघालेले आहे. सानंदा यांचा प्रवेश सोहळा होण्यापूर्वीच बाजार समितीचे सभापती सुभाष पेसोडे व काही संचालक यांनी मुंबई येथे अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश केला होता. सानंदा यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेशावेळी त्यांच्यासोबत काँग्रेसचे तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही प्रवेश घेतला. मात्र काँग्रेसचा मोठा जनाधार असलेल्या या मतदारसंघात काँग्रेसला गळती लागत असतानाच काँग्रेसच्या निष्ठावंत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपण काँग्रेसमध्येच राहण्याचा निर्णय घेतलेला आहे.

# ...आणि तो एअर इंडियाचे विमान पकडण्यासाठी धावपट्टीवर धावला!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई–** बिहारमधील पवन सोनी नावाचा एक प्रवासी मुंबईहून पाटणाला जाणारे एअर इंडियाचे विमान एआय ६७३ पकडण्यासाठी धावपट्टीवर धावत आला तेव्हा मुंबई विमानतळावर गोंधळ उडाला. बिहारमधील दरभंगा येथील रहिवासी पवन सोनी सकाळी ९:५० वाजताच्या नियोजित बोर्डिंग वेळेपेक्षा उशिरा पोहोचला, त्यानंतर तो बोर्डिंगसाठी धावपट्टीवर धावला.

सहसा असे दिसून येते की लोक ट्रेन किंवा बस चुकल्यावर ती पकडण्याचा प्रयत्न करतात, परंतु विमान पकडण्यासाठी धावपट्टीवर धावणे ही एक विचित्र घटना आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर घडलेल्या या घटनेमुळे सुरक्षा प्रोटोकॉलवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पियुष पवन सोनी हा आपत्कालीन गेटचा वापर करून आणि कोणालाही न कळवता धावपट्टीवर पोहोचला. त्याला त्याची फ्लाईट एआय



६७३ कोणत्या गेट नंबरवर किंवा रनवेवर उभी आहे हे माहित नव्हते आणि म्हणूनच तो चुकून भुजहून परतणाऱ्या एअर इंडियाच्या फ्लाईट एआय ६०२ कडे गेला. विमानतळ अधिकाऱ्यांनी त्याला ताबडतोब ताब्यात घेतले आणि मुंबई पोलिसांच्या ताब्यात दिले. सोनी यांच्याविरुद्ध विमान कायद्याच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मुंबई पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपीविरुद्ध आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरनुसार, विमानतळ अधिकाऱ्यांनी सोनीला विचारले की तो धावपट्टीवर कसा पोहोचला, तेव्हा त्याने सांगितले की एका बस चालकाने त्यांना तिथे येऊ दिले.

# नागपूरमध्ये खासगी कंपन्यांना वीज पुरवठ्याचा परवाना मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर**

महाराष्ट्रात समांतर वीज वितरण व्यवस्थेच्या दिशेने पावले टाकली जात आहेत. महावितरणे मुंबई शहरातील वीज वितरणासाठी परवान्याची मागणी केल्यानंतर आता नागपूर, पुणे, ठाणे आदी शहरांमध्येही खासगी कंपन्यांना परवाने देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महाराष्ट्र प्रदेश नियामक आयोगाने नोटीस जारी करीत खासगी कंपन्यांना परवान्यासाठी पात्र ठरवत २२ जुलै रोजी ऑनलाइन सुनावणी घेण्याची घोषणा केली आहे. या खासगी कंपन्यांना परवाना मिळाल्यास महावितरणचा एकाधिकार मोडीत निघणार आहे. ही कृती म्हणजे उर्जा क्षेत्राच्या खासगीकरणाच्या दिशेने पाऊल असल्याची टीका होऊ लागली आहे.



टोरंट पॉवरने नागपूरसह परिसरातील तसेच पुणे येथील वीज वितरणासाठी परवान्याची मागणी केली आहे. यासाठी नोव्हेंबर २०२२मध्ये आयोगाकडे याचिका दाखल केली आहे. ८ जानेवारी २०२३ रोजी आयोगाने नोटीस प्रकाशित करीत नागरिकांकडून सूचना व आक्षेप मागविले. याच प्रकारचा एक अर्ज अदानी इलेक्ट्रिसिटीने ठाणे, नवी मुंबई आदी भागांसाठी केला होता. दरम्यान, मुंबईवगळता राज्यभरात वीज वितरण करणारी सरकारी कंपनी महावितरणने याच महिन्यात मुंबई शहरातील कुलाबा ते माहीम, पश्चिम उपनगरातील बांद्रा ते दहीसर, पूर्व उपनगरात विक्रोळी ते चुनाभट्टी व मानखुर्दसोबतच चेना व काजुपाडा, मीरा भाईंदर महापालिका क्षेत्रात वीज वितरणाची परवानगी मागितली आहे.

**कोणत्या कंपनीने मागितले ?**

महावितरण : मुंबई शहर व मीरा भाईंदर मनपा क्षेत्र

टोरंट पॉवर : नागपूर, पुणे, पिंपरी चिंचवड, बारामती, इंदापूर, दौंड, सासवड, रांजणगाव, चाकण, कुरकुंभ, वसई, विरार, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, ठाणे मनपा क्षेत्र.

अदानी: मुलंड, भांडुप, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, खारघर, तळोजा व उरण.

**अर्जांना हिरवी झेंडी**

आयोगाने नोटीसमध्ये म्हटले आहे की, टोरंट पॉवर व अदानी इलेक्ट्रिसिटी वीज वितरणासाठी पात्र ठरले आहेत. त्यांना परवाना देण्यासाठी प्रस्तावित केले आहे. आयोगाने या निर्णयावर १६ जुलैपर्यंत आक्षेप व सूचना मागविल्या आहेत. कंपन्यांना यावर तीन दिवसात उत्तर द्यायचे आहे. २२ जुलै रोजी यासंदर्भात ऑनलाइन सुनावणी होईल.

# राज्यात जमिनीच्या तुकडे बंदी कायद्यात लवकरच सुधारणा, महसूल मंत्र्यांचे सुतोवाच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर**

महाराष्ट्रामध्ये रहिवाशी क्षेत्रामध्ये एक गुंठा जमीनीचा तुकडा पाडता येईल, असा कायदा आम्ही विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आणतो आहे, असे महसूलमंत्री व भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यामध्ये तुकडे बंदी कायद्याची सुधारणा करा याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यामुळे आम्ही सुधारणेचे पुढचे पाऊल टाकतो आहोत. राज्यात महायुती सरकार आल्यानंतर महसूल खात्यामध्ये जवळपास महत्त्वाचे १७-१८ निर्णय आम्ही घेतले. त्याची अंमलबजावणी सुरू झाली. अधिवेशनात वन स्टेट वन रजिस्ट्रेशन, व्हर्टिकल स्वामित्व देण्याबाबत प्रयत्न करणार आहोत. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा नेहमीच केंद्रस्थानी राहिली असून, आमच्या विधानमंडळातील संपूर्ण कामकाज मराठीतच आहे. विधानमंडळातील सर्व बोर्डही मराठीतच आहेत.



मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कारकिर्दीबाबत ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांसाठी जे उपक्रम सुरू केले आहेत ते स्वतंत्र भारताच्या इतिहासात यापूर्वी कधीही झाले नव्हते. महिलांचे सक्षमीकरण मोदींच्या काळात जेवढे होत आहे, तितके पूर्वी कधीही झाले नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेपासून राष्ट्रपती भवनापर्यंत महिलांना प्राधान्य दिले. लोकसभा, राज्यसभा किंवा विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणि सत्ताकेंद्रात आणण्याचा प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहेत.

# निवडणुकीपूर्वी स्मार्ट मीटर लावणार नसल्याची घोषणा, आता सर्वत्र मात्र स्मार्ट मीटरची सक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ नागपूर**

विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामान्य ग्राहकांकडे स्मार्ट मीटर लावणार नसल्याचे घोषित केले होते. परंतु, आता मार्च-२०२६ पर्यंत हे मीटर सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांकडे लागतील, असे खुद्द महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी एका कार्यक्रमात सांगितले.

महावितरणने काही वर्षांपूर्वी राज्यात सर्वत्र स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्याची घोषणा केली होती. त्यासाठीचे कंत्राटही अदानी व इतर खासगी कंपन्यांना दिले होते. परंतु, या निर्णयाला कडाडून विरोध झाला. वाढता विरोध बघता तत्कालीन ऊर्जामंत्री फडणवीस यांनी हे मीटर सामान्य ग्राहकांकडे लागणार नाहीत, असे विधानसभेत घोषित केले. तेच फडणवीस आता स्वत: मुख्यमंत्री असून त्यांच्याच काळात स्मार्ट मीटर लावण्याचा वेग वाढवण्यात आला आहे.



महावितरणच्या नुकत्याच मुंबईत झालेल्या वर्धापन दिन कार्यक्रमात कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीच देशात स्मार्ट मीटर बसवण्याची सर्वाधिक गती महाराष्ट्राची असून रोज ४५ हजारांच्या जवळपास मीटर लावले जात असल्याचे सांगितले व सोबतच मार्च २०२६ पर्यंत सर्व ग्राहकांकडे मीटर लावण्याचे लक्ष्य असून सर्वांनी त्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहनही केले.

राज्यात स्मार्ट प्रीपेड मीटरला पहिल्या दिवशीपासूनच विद्युत क्षेत्रातील विविध संघटना आणि ग्राहक संघटनांनी कडाडून विरोध केला आहे. आताही अधून- मधून या मीटर विरोधात राज्यातील विविध भागात आंदोलन होतांना दिसतात. या आंदोलनाच्या दबावताच विधानसभा निवडणुकीपूर्वी सत्ताधारी महायुती सरकारने हे मीटर घरगुती व सामान्य ग्राहकांकडे लावणार नसल्याची घोषणा केली होती.

# ट्रकच्या मद्यधुंद चालकाची कारला धडक

## डॉ. सुरेश गोदाळे थोडक्यात बचावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४गुरुकुंज मोझरी**

गुरुकुंज मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर सोमवारी दुपारी ४.२० वाजता एक भीषण अपघात घडला. रामकृष्ण हरी मंदिर दासटेकडीकडून राष्ट्रीय महामार्गाकडे भरधाव वेगाने येणार्या ट्रक क्रमांक एमएच-०४ ईएल ८१७१ने सुझुकी बोलेनो कार क्रमांक एमएच २७ बीझेड ८५६० ला मागून जोरदार धडक दिली. ही बोलेनो कार डॉ. सुरेश गोदाळे (श्री गुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय) यांची असून, ते काम आटोपल्यावर अमरावतीकडे जात होते. महाविद्यालयापासून काही अंतरावर हा अपघात घडला. मागून येणार्या ट्रकच्या वेगाची जाणीव होताच डॉक्टरांनी आपली कार रस्त्याच्या कडेला उभी केली होती. मात्र तरीही ट्रकने जोरदार धडक दिली. या धडकेत कारच्या मागील भागाचा अक्षरशः चुराडा झाला तर ट्रक थेट रस्त्याच्या खाली उतरला.



अपघातानंतर परिसरातील नागरिक, महाविद्यालयाचे कर्मचारी व प्राध्यापक घटनास्थळी धावले. डॉक्टर गोदाळे सुखरूप असल्याचे पाहून सर्वांनी सुटकेचा निश्वास घेतला. ट्रकचालकाला खाली उतरवले असता तो अत्यंत मद्यधुंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. नागरिकांनी तात्काळ तिवसा पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी ट्रकचालकास ताब्यात घेतले. प्रारंभी सामोपचाराचा प्रयत्न झाला. मात्र, गाडीचे मोठे नुकसान लक्षात घेता डॉ. गोदाळे यांनी तक्रार दाखल केली. ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून पोलिसांनी ट्रक व चालक ताब्यात घेतले आहे.

**गतीरोधक बसवण्याची मागणी**

गुरुकुंज मोझरी ते चांदूर बाजार रस्ता हा अत्यंत वर्दळीचा असून दासटेकडी परिसरात अनेक वेळा अपघात घडले आहेत. आयुर्वेद महाविद्यालय आणि आयटीआय याच मार्गावर असल्याने विद्यार्थी, कर्मचार्यांची वर्दळही मोठी आहे. त्यामुळे या ठिकाणी गतीरोधक बसवावेत, जेणेकरून वाहनांचा वेग कमी होईल आणि अपघात टाळता येतील, अशी मागणी सा. बा. विभागाकडे केली आहे.

# वर्षभर बलात्कार, गर्भधारणेनंतर मृत्यू : पिडीता होती अल्पवयीन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४धारणी**

धारणीपासून जवळच्या जुटपाणी गावातील अल्पवयीन मुलीला फूस लावून पळविल्यावर वारंवार बलात्कार करणार्या युवकाविरुद्ध धारणी पोलिसात तक्रार दाखल झाल्याने एकच खळबळ माजलेली आहे. मुलीची गर्भधारणा झाल्यावर सरकारी दवाखान्यात भरती केल्यावर प्रकरण समोर आले. सिकलसेलची रुग्ण असल्याने तिला नागपूर रेफर करण्यात आले होते. पिडीता उपचारा दरम्यान मरण पावली.



मेळघाटात बालविवाह आणि कुमारी मातेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. महसूल विभाग, पोलिस विभाग, उन्नती संस्था व अनुसंधान ट्रस्ट संस्थेकडून बालविवाह प्रतिबंधासाठी वर्षभर विविध कार्यक्रम राबविले जातात तरी धारणी व चिखलदरा भागात बालविवाह होतच असतात. धारणीपासून १० कि. मी. अंतरावरील जुटपाणी गावातील १७ वर्ष वयाच्या एका मुलीला फुस लावून अनिल (२१, रा. जुटपाणी) याने पळविले आणि वर्षभर वारंवार बलात्कार केला. काही महिने अनिलने मुलीस घरातच ठेवलेले होते. मुलीस गर्भधारणा झाल्याने तिने उपजिल्हा रुग्णालय धारणी येथे दाखविले म्हणून गर्भधारणा झाल्याचे समजले व प्रकरण बाहेर आले. मुलीस तीव्र सिकलसेल असल्याने तात्काळ नागपूर पाठविण्यात आले. मुलीच्या आईने धारणी पोलिसात तक्रार दाखल केल्यावर वर्षभर शोषण आणि वारंवार शारिरीक उपभोगाची माहिती समोर आली.पोलिस निरीक्षक अशोक जाधव यांनी कलम ४६ (बाल लैंगिक प्रतिबंधक कायदा) तथा १३७ (२), ६४ (२)(१), ६४ (२)(एम) बीएनएस अन्वये गुन्हा कायम करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोलिस उप निरीक्षक सोळंके व हे. काँ. वसंत चव्हाण करत आहेत. नागपूर येथे सिकलसेल आणि अप्राकृतिक गर्भधारणेचे उपचार सुरू असताना पिडीता मरण पावली. या घटनेमुळे कमी वयात लग्न किंवा भागाभागीचे प्रकरणाचा अंत अत्यंत दुर्दैवी व गंभीर होत असते, हे उजेडात आलेले आहे. या घटनेमुळे धारणी परिसरात एकच खळबळ माजलेली आहे.

# गॅस सिलिंडर दरवाढीची शक्यता!

## इराण-इस्रायल युद्धामुळे ऊर्जा बाजार अस्थिर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

इराण आणि इस्रायलमधील सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. अमेरिकेने इराणच्या अणुस्थळांवर केलेल्या हल्ल्यांमुळे एलपीजीसह इंधन पुरवठ्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. परिणामी, भारतासारख्या आयातदार देशांमध्ये गॅस सिलिंडरच्या दरात लवकरच मोठी वाढ होऊ शकते.



अहवालानुसार, भारतात वापरल्या जाणार्या एलपीजीपैकी सुमारे ६६% गॅस हा आयात केला जातो. यातील ९५% गॅस सौदी अरेबिया, युएई आणि कतारसारख्या पश्चिम आशियातील देशांतून येतो. या भागातील युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होण्याचा धोका वाढला आहे.

**भारतात एलपीजीचा तुटवडा होण्याचा धोका**

१६दिवसांचा एलपीजी साठा शिल्लक पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, सध्या भारतातील आयात टर्मिनल्स, रिफायनरीज आणि बॉटलिंग प्लांट्समध्ये केवळ १६ दिवसांचा एलपीजी साठा शिल्लक आहे. जर युद्धामुळे आयात ठप्प झाली, तर देशात एलपीजीचा मोठा तुटवडा निर्माण होऊ शकतो.गेल्या काही वर्षांत एलपीजीची मागणी दुप्पट झाली आहे. सध्या देशातील ३३ कोटी कुटुंबे एलपीजीवर अवलंबून आहेत. त्यामुळे साठवणुकीवरील मर्यादा आणि आयातीवरील वाढलेले अवलंबित्व भारतासाठी गंभीर आव्हान ठरू शकते. सरकारने पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

# फेसबुक फसवणुकीचा नवा फंडा! जिल्हाधिकाऱ्याच्या नावाने क्युआर कोडचा वापर

## पोलिस ठाण्यात धाव : तक्रारी वाढण्याची अधिक शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या नावाने बनविण्यात आलेल्या फेक अकाउंटमुळे चांदूरबाजार तालुक्यातील एका तरुणाला ६२ हजार रुपयांचा फटका बसला. ते फेक अकाउंट डीॲक्टिव्हेट होण्यापूर्वीच तो प्रकार घडल्याचे सोमवारी दुपारी स्पष्ट झाले. आपल्या मुलाची फसवणूक झाल्याचे समजताच त्याच्या आईने अमरावती शहर गाठले. तिला तक्रारीसाठी चांदूरबाजार पोलिस ठाण्यात पाठविण्यात आले.



सायबर भामट्याने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे कार्यालयातील खुर्चीवर बसलेले छायाचित्र असलेले एक फेक अकाउंट फेसबुकवर तयार केले. त्या अकाउंटवरून त्या आरोपीने २२ जून रोजी अनेकांना 'हाय' असा मॅसेज केला. त्यावर रिप्लाय देणाऱ्यांना सायबर भामट्याने आपण जिल्हाधिकारीच बोलत असल्याचे भासवले.

चांदूरबाजार तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या मुलानेसुद्धा त्या मॅसेजला रिप्लाय दिला. त्यावर त्याला फर्निचर खरेदी करण्यासाठी आरोपीकडून एक क्यूआर कोड पाठविण्यात आला.हा क्यूआर कोड आल्यानंतर त्या मुलाने सुरुवातीला ५५ हजार, नंतर ५ हजार व शेवटी २ हजार अशा पद्धतीने एकूण ६२ हजार रुपये पाठवले. मात्र काही वेळाने हा प्रकार फसवेगिरीचा असल्याचे समोर आले.

दरम्यान, या प्रकरणी फसवणूक झालेल्या मुलाच्या आईने सोमवारी ग्रामीण पोलिसांचे सायबर पोलिस ठाणे गाठून या प्रकाराबाबत माहिती दिली आहे. या प्रकरणात तक्रारीवरून चांदूर बाजार ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# बोगस कृषी कंपन्या शिरजोर? कृषी विभागाने आपल्याच अधिकाऱ्यांचे अधिकार घेतले काढून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

शेतकऱ्यांना भेसळमुक्त, गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठा, बियाणे, खते व कीटकनाशके मिळावीत, यासाठी कृषी विभागाने गुणनियंत्रण अधिकारांचे विकेंद्रीकरण केले होते. मात्र, २० जून रोजी जारी अधिसूचनेद्वारे कृषी विभागाने आपल्याच अधिकाऱ्यांचे अधिकार काढून घेतले आहेत. बोगस कृषी कंपन्यांच्या दबावात शासनाने आपलाच गुणनियंत्रण विभाग दुबळा केल्याचा आरोप यानिमित्ताने होत आहे.

यापूर्वी कृषी निविष्ठांचे कंपनी पातळीपासून डीलर व कृषी केंद्रांपर्यंत नमुने घेतले जात होते. हे नमुने शासनाच्या प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी पाठवून, अहवालानुसार संबंधितांवर तात्काळ कारवाई केली जात होती. राज्यात यासाठी पं. स. कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तंत्र अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी उपसंचालक, जिल्हा गुणवत्ता कृषी अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी, जि.प.चे मोहीम अधिकारी अशी फळी कार्यरत होती. त्यामुळे बियाणे, कीटकनाशके, खते उत्पादक व विक्रेते यांना भेसळ करायला वाव कमी व शासनाचा वचक कायम होता.

ही बाब निविष्ठा उत्पादकांना बाधक होती, त्यामुळेच कृषी अधिकाऱ्यांचे अधिकार कमी करून विभाग दुबळा करण्यात आल्याचे मानले जात आहे. यात आयुक्तालयातील काही अधिकाऱ्यांची नावे चर्चेत आहेत. आता पूर्णवेळ व अर्धवेळ गुणवत्ता निरीक्षकांची संख्या कमी करून नवीन गुणवत्ता निरीक्षक अधिसूचित केल्याने हा विभाग पांगळा झाला आहे. तथापि 'माफदा'ने या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# सक्तीची कर्जवसुली व कर्जमाफीसाठी पुन्हा बच्चू कडू यांचा एल्गार

## ५ जुलै पासून 'सातबारा कोरा कोरा कोरा'यात्रेला प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

शासनाच्या धोरणांमध्ये सातत्याने दुर्लक्षित राहिलेल्या शेतकरी, शेतमजूर, विधवा, दिव्यांग, बेरोजगार तरुण, ग्रामपंचायत कर्मचारी, मेंढपाळ, मच्छिमार आणि मागासवर्गीय घटकांच्या न्यायहक्कांसाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वात 'सातबारा कोरा करा' ही १३८ किलोमीटरची पदयात्रा ५ जुलै पासून सुरू होणार आहे.शेतकऱ्यांना जोपर्यंत सरकार न्याय देणार नाही तोपर्यंत आपण स्वस्थ बसणार नसल्याचा इशारा बच्चू कडू यांनी पत्रकार परिषदेतून दिला.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथून यात्रेला प्रारंभ होणार असून, चिलगव्हाण (साहेबराव करपे - पहिली शेतकरी आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांचे ग गाव) येथे या यात्रेचा समारोप होईल. ही यात्रा उंबरडा बाजार, बोदेगाव, दारव्हा, तिवरी, तूपटाकळी, काळी दौलत, गुंज या प्रमुख ठिकाणांवरून मार्गक्रमण करणार असून एकूण सात दिवसांत १३८ किमी अंतर पार केले जाणार आहे.

ही यात्रा केवळ एका राजकीय व्यक्तीची नसून, ती शेतकरी व कष्टकरी जनतेच्या हक्कांसाठीची लोकचळवळ आहे. सक्तीची कर्जवसुली थांबवणे आणि तात्काळ कर्जमाफी लागू करणे या प्रमुख मागण्यांवर ही यात्रा केंद्रित असणार आहे. दरम्यान प्रत्येक ठिकाणी सभा, संवाद व स्थानिक अडचणी समजून घेण्यासाठी थांबे घेतले जातील.

यात्रेदरम्यान शेतकरी आत्महत्यांना आळा घालणारी धोरणं लागू करणे, विधवा व अपंगांसाठी रोजगार व सुरक्षा योजनांची अंमलबजावणी करणे, मनरेगा अंतर्गत पेरणी ते कापणीपर्यंतच्या कामांचा विस्तार व मजुरीत वाढ करणे आणि तरुणांसाठी शिक्षण व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे यासारख्या मागण्या मांडण्यात येणार आहेत.



### बस झाल्या आता आत्महत्या !

बेमुदत अन्नत्याग आंदोलनात लाखो शेतकरी मला पाठिंबा देण्यासाठी आले होते. आता मी शेतकऱ्यांच्या भेटीसाठी त्यांच्या गावीच चालत जाणार आहे. ही यात्रा तुमच्यासाठी, तुमच्या पोटासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी आणि कुटुंबाच्या अस्तित्वासाठी आहे. पक्ष, जात, धर्म बाजूला ठेवून एकत्र या. मतदान कोणालाही करा, पण कष्टकरी माणसासाठी एकत्र या.

**बच्चू कडूमाजी राज्यमंत्री**

# छपराशिवायच सुरू झाल्या दोन शाळा विद्यार्थी कसे घेणार शिक्षण?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४चिखलदरा**

तालुक्यातील चिखली व बामादेही या दोन गावातील जिल्हा परिषद शाळेची टिनपत्रे उडाली असून या शाळेमध्ये अजूनही टिनपत्रे बसविण्यात आले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे. चिखली हे गाव तालुक्यातील अतिशय दुर्गम गाव असून या गावाची लोकसंख्या तीन ते चार हजार इतकी आहे. उन्हाळ्यात या ठिकाणची टिनपत्रे उडाली होती. परंतु अजूनही दुरुस्त करण्यात आलेले नाही. त्यामुळे आता शाळा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांच्या बसण्याची गैरसोय होणार आहे.



लवकरात लवकर ही शाळा दुरुस्त करावी तसेच तालुक्यातील बामादेही या ठिकाणचे सुद्धा जिल्हा परिषद शाळेचे टिनपत्रे उडालेले आहेत. तेसुद्धा लवकरात लवकर दुरुस्त करण्यात यावे, या ठिकाणी सुद्धा आदिवासी विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे. तालुक्यातील या दोन शाळा नादुरुस्त असून या ठिकाणी विद्यार्थ्यांना बसण्याची सोय नाही. गावातील नागरिक गजबलाल कस्तुरे पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, चिखलीच्या जिल्हा परिषद शाळेतील टीनपत्रे उन्हाळ्यात उडालेली आहेत, त्यामुळे ही शाळा नादुरूस्त असून जिल्हा परिषद प्रशासनामार्फत ही शाळा दुरुस्त करण्यात आली नाही. शाळा लवकरात लवकर दुरुस्त करावी आणि विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी.

**प्रस्ताव पाठविले आहे**

बामादेही व चिखली या दोन्ही जिल्हा परिषदेच्या शाळेवरील टीनपत्रे उडालेले आहेत. याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठवलेला आहे. लवकरात लवकर दुरुस्त करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया चिखलदरा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे यांनी दिली.

# नालेसफाईच्या कामांची महापालिका उपायुक्तांचे केली विविध भागातील नाल्यांची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

पावसाळ्याच्या पाश्र्वभूमीवर नालेसफाई तसेच इतर सर्व कामांना गती देऊन, नियोजनबद्ध पद्धतीने काम वेळेत पूर्ण करण्याचे आदेश उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी दिले. यासाठी सातत्याने स्थळपाहणी करून पावसाच्या पाण्याचा त्वरित निचरा होईल आणि रस्ते जलमय होणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

अमरावती महापालिकेच्यावतीने पावसाळापूर्व कामांचा आढावा घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी सार्वजनिक बांधकाम कार्यालय जवळील कॅम्प परिसरातील, दस्तुर नगर रोड गानुवाडी मनोर मांगल्य, मंगल कार्यालयानजीक व पार्वती नगर परिसरातील नाल्यांची तसेच पाणी साठणाऱ्या संभाव्य ठिकाणांची पाहणी केली. तसेच पावसाळ्यात पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊन, नागरिकांच्या घरांमध्ये नाल्याचे पाणी जाणार नाही, याची काळजी घेण्यात यावी. त्यादृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. नाल्याचे खोलीकरण करणे व कल्वर्ट साफ करनेच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या पाहणी दौऱ्यादरम्यान सदर परिसरातील नाल्यांची तसेच संभाव्य पाणी साठणाऱ्या भागांची पाहणी उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी केली.

# नाईक प्लॉट येथील दुकानफोडीचा गुन्हा काही तासांत उघड, परतवाडा पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४परतवाडा**

परतवाडा पोलिसांनी अवघ्या काही तासांत नाईक प्लॉट कांडली येथील हरिओम किराणा दुकानफोडीचा गुन्हा उघडकीस आणत आरोपीला अटक केली. दुकानाचे कुलूप तोडून १७,०५० रुपये चोरी करण्यात आले होते. ही घटना २३ जून रात्री ११ ते २४ जून सकाळी ५ च्या दरम्यान घडली होती.



परतवाडा पोलीस स्टेशनने याप्रकरणी भा.दं.वि. कलम ३०५(अ), ३३४(१) नुसार गुन्हा दाखल केला. डीबी पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे संशयित आरोपी शेख सलीम उर्फ नायटा (३३, रा. मुगलाईपुरा) याला बैतूल स्टॉपजवळ अटक केली. त्याच्याकडून १७,०५० रुपये रोख रक्कम आणि एमएच-२८-ए-५७५८ क्रमांकाची मोटारसायकल असा एकूण ४७,०५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पोलिस रेकॉर्डप्रमाणे, आरोपीवर याआधीही गुन्हे दाखल असून सदर दुचाकीसंदर्भात आणखी एक गुन्हा आधीच नोंदवलेला आहे. या यशस्वी कारवाईमुळे परतवाडा पोलिसांच्या नोंदीतील दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अचलपूर उपविभागीय अधिकारी डॉ. शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरेश म्हस्के, स.पो.नि. युवराज रखडे आणि त्यांच्या पथकाने केली.

# रस्त्याने दुचाकीने जात असलेल्या दाम्पत्याच्या अंगावर कोसळला वृक्ष : सुदैवाने मोठी दुर्घटना टळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

शहरात सुरू असलेला पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे अनेकदा जनजीवन विस्कळीत होत आहे . आज दुपारी एक अशी घटना समोर आली, ज्याने सर्वांनाच धक्का बसला. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या शवविच्छेदन गृहाजवळ रस्त्याच्या कडेला असलेले एक विशाल झाड अचानक कोसळले. या घटनेत एक महिला थोडक्यात बचावली, त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे.

शहरात गेल्या काही तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यांनी अनेक भागांतील झाडांचे मोठे नुकसान केले आहे. अशीच एक धक्कादायक घटना आज दुपारी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या अगदी समोर घडली. मिळालेल्या माहितीनुसार, एक जुने आणि भलेमोठे झाड अचानक कोसळले आणि रस्त्यावर येऊन पडले. ज्यावेळी हा अपघात झाला, त्यावेळी सुभाष खंडारे त्यांच्या पत्नीसह दुचाकीवरून त्याच रस्त्याने जात होते. सुदैवाने, खंडारे आणि त्यांच्या पत्नीचा मोठा अपघात होता होता टळला. मात्र, झाड अंगावर पडल्याने त्यांच्या पत्नीच्या डोक्याला किरकोळ दुखापत झाली आहे. घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका सतर्क वाहतूक पोलिसांनी तात्काळ मदतीसाठी धाव घेतली. त्यांनी केवळ जखमी महिलेला मदत केली नाही, तर वाटसरूंच्या मदतीने कोसळलेले झाड बाजूला करण्यासाठीही महत्त्वाची भूमिका बजावली, ज्यामुळे वाहतूक पुन्हा सुरळीत झाली.





ही घटना पुन्हा एकदा मनपाच्या उद्यान विभागाच्या जबाबदारीवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. शहरात अनेक ठिकाणी अशीच कच्ची आणि जुनी झाडे आहेत, जी मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यात कधीही कोसळू शकतात. अशा अप्रिय घटना टाळण्यासाठी उद्यान विभागाने तात्काळ या झाडांची पाहणी करून ती सुरक्षित करण्यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे.

### मनपा उद्यान विभाग झोपेत

ही घटना स्पष्टपणे मनपाच्या उद्यान विभागासाठी एक इशारा आहे. शहरात अशी अनेक झाडे आहेत जी जीर्ण-शीर्ण अवस्थेत आहेत आणि कधीही कोसळू शकतात. नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी विभागाने याकडे तात्काळ लक्ष देणे आवश्यक आहे.मात्र मनपा उद्यान विभाग झोपेत आज स्पस्ट झाले. आशा आहे की, या घटनेतून धडा घेऊन मनपा भविष्यात अशा कोणत्याही अप्रिय घटना टाळण्यासाठी सक्रिय पावले उचलेल.

# पातुर- बाळापूर रस्त्यावरील बाबूळगाव जवळ भीषण अपघात : ट्रकच्या धडकेत रिक्षा उडाली; दोघांचा मृत्यू, चार प्रवासी गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ पातूर अकोला**

प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षाला समोरून येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. ट्रकच्या धडकेत रिक्षातील सर्व प्रवासी रस्त्यावर फेकले गेले असून यात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. तर रिक्षातील चार प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना लागलीच रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातानंतर वाहतूक काही काळ खोळंबली होती.

अकोल्याच्या पातूर जवळ प्रवासी रिक्षा आणि ट्रकमध्ये धडक होऊन हा भीषण अपघात झाला आहे. पातुर- बाळापूर रस्त्यावरील बाबूळगाव जवळ हा भीषण अपघात झाला आहे. यात भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने प्रवासी घेऊन जाणाऱ्या रिक्षाला जोरदार धडक दिल्याने या अपघातात ऑटो रिक्षा मधील काही प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान यात रिक्षातील दोन प्रवाशांचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे.





**दहा फूट उडाली रिक्षा**

ट्रकची धडक इतकी भीषण होती की रिक्षा दूरवर जाऊन पलटी झाली. यात रिक्षातील सर्व प्रवासी रस्त्यावर फेकले गेले. यात रिक्षातील प्रवासी पियुष रविंद्र चतरकर (वय १३, रा.सिंधी कॅम्प, अकोला) आणि लिलाबाई ढोरे (वय ५०, रा.लाखनवाडा) या दोघांचा मृत्यू झाला. तर सुरेंद्र चतरकर (वय ४५), रविंद्र चतरकर (वय ५२), रूपचंद वाकोडे (वय ५०), प्रमिलाबाई वाकोडे (वय ६५) हे गंभीर जखमी झाले आहेत.

**ट्रक चालक फरार**

अपघात घडताच रस्त्यावरून जाणाऱ्यांनी वाहने थांबवत मदतीचा हात दिला. यानंतर अपघातातील गंभीर जखमी झालेल्या चौघांना अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यानंतर वाहतूक सुरळीत केली. दरम्यान, अपघातानंतर ट्रक चालक फरार झाला असून बाळापूर पोलीस अधिक तपास करीत आहे.

# खड्ड्यांचा पत्ता नाही, वृक्ष लागवड केव्हा? अभिसरणमुळे वन विभागाचे 'कल्याण'

## दहा कोटी वृक्ष लावगडीचे नियोजन शून्य...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात यंदा दहा कोटी वृक्ष लागवड करायची आहे. त्याकरिता विविध विभागावर जबाबदारी सोपवली आहे. वन विभाग वगळता अन्य विभागाला राज्य निधी मिळणार आहे. पावसाळा सुरू झाला असताना कुठेच खड्डे खोदण्यात आले नाही. त्यामुळे वृक्ष लागवड केव्हा करणार हा प्रश्न यंत्रणेपुढे कायम आहे. एकंदरीत वन विभागाचे अभिसरण योजनेमुळे 'कल्याण' होणार असल्याचे चित्र आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी हरित समृद्ध महाराष्ट्र करण्यासाठी २६ विभागांना १० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दिले आहे. यात सर्वाधिक ४ कोटी वृक्ष लागवडीचे टार्गेट रेशीम विभागाला देत वन विभागाने आपल्या अंगावरील घोगडं झटकले आहे. खरे तर १० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट सहजतेने वन विभाग पूर्ण करू शकले असते. मात्र, आयएफएस लॉबीने केवळ दोन कोटी वृक्ष लागवडीचे टार्गेट का घेतले, हा संशोधनाचा विषय आहे. मात्र हे दोन कोटी वृक्ष लागवडीचे टार्गेट



अभिसरण योजनेतून पूर्ण करायचे असल्याने अद्यापही खड्डे खोदण्याचे काम ठप्प आहे, हेच सर्वदूर चित्र आहे.

वन विभागात के.के. पुन्हा सक्रिय झाले असून, वन सचिवांची दिशाभूल करून वन विभागात रोहयो आणि अभिसरण योजनेतून दोन कोटी वृक्ष लागवड करण्याचे ठरविले आहे. या निर्णयाला सध्या वन विभागात विरोध होत असून, मुख्यमंत्र्यांचे हरित महाराष्ट्राचे स्वप्न तर भंगणार नाही ना? असे दिसून येत आहे. इतर विभाग वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट हे राज्य योजना निधीतून करत असताना वन विभागाला मात्र अभिसरण योजनेतून दोन कोटी वृक्ष लागवडीचा अट्टाहास के.के. यांनी चालविला आहे.

**ग्रामीण भागात शेती कामे, मजूर मिळेना**

सध्या पावसाळा सुरू झाला असून, शेती कामांनी वेग घेतला आहे. त्यामुळे वृक्ष लागवडीसाठी २७२ रुपये दराने ग्रामीण भागात मजूर उपलब्ध होईल का? असा सवाल वन कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे वन विभागात तूर्त वृक्ष लागवडीचे नियोजन ढेपाळल्याचे वास्तव आहे.

# बच्चूभाऊ कडू जिल्हा मध्यवर्ती बँक अध्यक्ष पदावर कायम

## जिल्हा मध्यवर्ती बँक अध्यक्ष अपात्र प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

विभागीय सहनिबंधक यांनी सर्व गोष्टी ढाब्यावर ठेवून,सुळबुध्दीने कारवाही करत मा.बच्चूभाऊ कडू यांना अध्यक्ष पादावरुन अपात्र केले या कारवाई च्या विरुद्ध मा.बच्चूभाऊ कडू यांनी न्यायालयात धाव घेतली होती, अाज न्यायालयाने निर्णय देत मा.बच्चूभाऊ कडू यांना जिल्हा मध्यवर्ती बँक अध्यक्ष पदी काय ठेवत मा .बच्चूभाऊ कडू यांच्या बाजूला निर्णय दिला आहे ...

